



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १९८ * नांदेड * सोमवार, दि. २७ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# पेपर लीक विरोधात आज नवीन विधेयक?

## चौकशीसाठी २ महिने, १० वर्षांचा तुरुंगवास अन् ५० लाख दंड



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आश्वासनानंतर केंद्रीय कार्मिक आणि प्रशिक्षण मंत्री जितेंद्र सिंह उद्या (२७ जुलै) सोमवारी लोकसभेत एक नवीन विधेयक सादर करण्याची शक्यता आहे. शिक्षा आणि दंडाच्या तरतुदी आणखी कडक करण्यात आल्या आहेत. विधेयकात कलम १२अ आणि १२ब अशी दोन नवीन कलमे जोडण्यात आली आहेत. याअंतर्गत, केंद्र सरकारला एक विशेष कृती दल स्थापन करता येईल. केंद्रीय तपास यंत्रणा किंवा एसआयटीला प्रकरण केंद्र सरकारकडे सोपवल्यानंतर दोन महिन्यांच्या आत तपास पूर्ण करणे बंधनकारक असेल. जलदगती न्यायालयांमार्फत दररोज सुनावणी घेतली जाईल. राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सल्ल्याने विशेष जलदगती न्यायालये नियुक्त करतील. आरोपपत्र दाखल केल्यापासून तीन महिन्यांच्या आत खटल्याची सुनावणी पूर्ण करणे बंधनकारक असेल.

या विधेयकात अपीलांसाठी कालमर्यादा देखील निश्चित करण्यात आली आहे. विशेष जलदगती न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील दाखल करता येईल. अशा अपीलांवर दोन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणी होईल आणि तीन महिन्यांच्या आत त्यावर निर्णय देण्याचा प्रयत्न केला जाईल. निर्णयाच्या ३० दिवसांच्या आत अपील दाखल करणे आवश्यक आहे, विशेष परिस्थितीत ही मुदत ९० दिवसांपर्यंत वाढवता येऊ शकते.

# जिल्हा बँकेसाठी सरासरी ९५.५४% मतदान

## २८ रोजी २६ उमेदवारांच्या भवितव्यांचा निकाल

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (नांजिमस) संचालक मंडळ निवडणुकीतील उर्वरित १२ जागांसाठी रविवारी (२६ जुलै) उत्साहात मतदान पार पडले. एकूण १,३४४ मतदारांपैकी १,२८४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने तब्बल ९४.५४ टक्के मतदान नोंदले गेले. सर्वपक्षीय समझोत्यातून ११ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या असल्या, तरी उर्वरित जागांसाठी झालेल्या चुरशीच्या लढतीमुळे जिल्ह्याचे लक्ष आता मंगळवार, २८ जुलै रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे.

आयटीआय परिसरातील ललित कला अकादमी येथे सकाळपासून मतमोजणीला सुरुवात होणार असून, बारा जागांसाठी रिंगणात असलेल्या २६ उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे. निवडणुकीपूर्वी सर्वपक्षीय समझोत्यातून बँकेच्या ११ जागा बिनविरोध झाल्या होत्या. भाजपचे खा. अशोकराव चव्हाण यांच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या 'शेतकरी विकास पॅनल' व बँक बचाव आघाडी शेतकरी विकास पॅनलने उर्वरित जागांसाठी गेल्या आठवडाभरात जिल्हाभर जोरदार प्रचार केला. जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी प्रयत्न झाले असले तरी काही ठिकाणी तरुण नेतृत्वाने निवडणूक लढविण्याचा निर्धार कायम ठेवत समझोत्याला ब्रेक लावला. त्यामुळे अनेक ठिकाणी निवडणूक रंगतदार झाली.

विशेष म्हणजे, खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रभावक्षेत्रातील भोकर विधानसभा मतदारसंघात भोकर, मुदखेड आणि अर्धापूर या तीन तालुक्यांमध्येच प्रतिष्ठेच्या लढती झाल्या. याशिवाय 'अ', 'ब' आणि 'क' गटांतील काही उमेदवारांनी माघार घेतली असली, तरी एकूण १२ जागांसाठी २६ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात राहिले. या निवडणुकीत मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवारांनी शेवटच्या क्षणापर्यंत जोरदार संपर्क मोहीम राबविली. विशेषतः भोकर, मुदखेड, अर्धापूर, हदगाव, हिमायतनगर आणि माहूर तालुक्यांतील मतदारांना विविध पद्धतीने संपर्क साधण्यात आला. पर्यटन व देवदर्शनासाठी बाहेर गेलेले काही मतदारही मतदानासाठी विशेष परतल्याचे चित्र दिसून आले.

रविवारी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नांदेड, अर्धापूर, मुदखेड, कंधार, लोहा, मुखेड, देगलूर, नायगाव, बिलोली, धर्माबाद, उमरी, भोकर, हदगाव, हिमायतनगर, किनवट आणि माहूर या १६ केंद्रांवर शांततेत मतदान पार पडले. मतदानादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नसून प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

यंदाच्या निवडणुकीत नांदेड, अर्धापूर, भोकर, माहूर, हादगाव, हिमायतनगर तसेच ओबीसी आणि अनुसूचित जाती-जमाती (एससी-एसटी) गटातील जागांवर विशेष प्रतिष्ठेच्या लढती पाहायला मिळाल्या. अनेक ठिकाणी पारंपरिक नेत्यांविरुद्ध नव्या चेहऱ्यांनी आव्हान उभे केल्याने निकालाबाबत उत्सुकता अधिक वाढली आहे.

एकूण १,३४४ मतदारांमध्ये नांदेड तालुक्यात सर्वाधिक १९८ मतदार, तर हिमायतनगर तालुक्यात सर्वात कमी २३ मतदार आहेत. हिमायतनगरमध्ये केवळ २३ मतांसाठीही चुरशीची लढत रंगली. येथे माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर आणि कुणाल राठोड यांच्यात प्रतिष्ठेची लढत झाली असून, राजकीय वर्तुळात जवळगावकर यांचे पारडे जड मानले जात आहे. नांदेड तालुक्यातही संगीता पाटील डक आणि अतुल वाघ यांच्यातील लढत लक्षवेधी ठरली आहे. एकूणच, विक्रमी मतदानामुळे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मतदारांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला आहे. आता या उच्च मतदानाचा फायदा कोणाला होणार आणि बारा जागांवर नेमका 'बाजीगर' कोण ठरणार, याचा अंतिम निर्णय मंगळवारी होणाऱ्या मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे.

# पेपरफुटी रोखण्यासाठी आता 'आधार' कार्डचे जनक मैदानात




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – नीट पेपरफुटी प्रकरणानंतर आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि परीक्षा व्यवस्थेतील सुधारणांसाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. इन्फोसिसचे सहसंस्थापक आणि नामांकित तंत्रज्ञान तज्ज्ञ नंदन नीलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय 'हाय-पावर टास्क फोर्स' स्थापन करण्यात येत असल्याची मोठी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली आहे. परीक्षा पद्धत अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवणे हा या टास्क फोर्सचा मुख्य उद्देश असेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इन्स्टाग्राम आणि इतर सोशल मीडियावर व्हीडीओ संदेश शेअर करत देशातील तरुणांना आणि पालकांना आश्वस्त केले. ते म्हणाले, भारत सरकार विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने ठोस निर्णय घेत आहे. ज्या लोकांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला आहे, ते आज तुरुंगात सडत आहेत. अशा प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी आपण आधीच फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन केले आहेत. याशिवाय संसदेत कडक कायदेशीर तरतुदींसह नवीन कायदा बनवण्याच्या दिशेनेही वेगाने काम सुरू आहे.

भविष्यातील परीक्षा प्रणालीबद्दल बोलताना पंतप्रधान म्हणाले की, आता आपल्याला केवळ कारवाईवर न थांबता भविष्याचा विचार करावा लागेल. आपली परीक्षा पद्धत पूर्णपणे पारदर्शक आणि तंत्रज्ञानावर आधारित असणे अत्यंत गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर नंदन नीलेकणी यांच्या नेतृत्वाखालील ही टास्क फोर्स संपूर्ण परीक्षा यंत्रणेचा अभ्यास करेल आणि त्यात आवश्यक सुधारणा सुचवेल. या टास्क फोर्सच्या अहवालाच्या आधारे आगामी सर्व परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि लीक-प्रूफ पद्धतीने घेतल्या जातील.

# बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा सक्रिय; राज्यभरात पुढील २ दिवस पाऊस



**मुंबई (प्रतिनिधी)** –बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय झाले असून येत्या दोन दिवसांत राज्यभरात पावसाचा जोर वाढणार आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील ४ दिवस कोकण किनारपट्टीसह घाटमाथ्यावर पूर्व विदर्भ व मराठवाड्यातील जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रात मुसळधार, अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून राज्यभरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद होत आहे. जुलै महिन्यात देशभरात सरासरीच्या तुलनेत उणे १५ टक्के पावसाची नोंद झाली. महाराष्ट्रात ०१ जुलै ते २५ जुलै दरम्यान, सरासरीच्या उणे ३ टक्के पाऊस झाला. पुढील दोन दिवस राज्यभरात पावसाचे इशारे जारी करण्यात आले आहेत. दक्षिण कोकण गोवा व दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात गुजरातपासून कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. परिणामी पुढील दोन दिवस, तळ कोकणासह कोकण किनारपट्टी व दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे.

कोकण-गोवा विभागातील जिल्ह्यांमध्ये बहुतांश ठिकाणी, तर दक्षिण मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची दाट शक्यता आहे. उत्तर मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस किंवा मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची दाट शक्यता आहे.

# नीट पेपरफुटी प्रकरणी उद्धव-राज ठाकरेंच्या मोर्चात मोठी गर्दी

**मुंबई (प्रतिनिधी)** –नीट पेपरफुटी प्रकरणी उद्धव व राज ठाकरे यांनी काढलेल्या मोर्चात युवकांनी मोठी गर्दी केली.

नीट पेपरफुटी प्रकरणानंतर सीजेपीसह देशभरातील विद्यार्थ्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. शनिवार, दि. २५ रोजी प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. आता प्रधान यांच्या राजीनाम्यापूर्वीच उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राज ठाकरे यांनी शिवाजी पार्क ते सिद्धीविनायकपर्यंत मोर्चा काढणार असे जाहीर केले होते. पण प्रधान यांनी राजीनामा दिल्यामुळे तो मोर्चा रद्द करून, जल्लोष मोर्चा शिवाजी पार्क येथे आयोजित केला. या जल्लोषमोर्चाला मोठ्या प्रमाणावर तरूणाई उपस्थित राहिली आहे. संपूर्ण परिसर तरुणाईने आणि गर्दीने फुलून गेला. हातात तिरंगा घेऊन सर्वजण जमले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे स्टेजवर आले. त्यांनी तरूणाईचं अभिनंदन केलं. यावेळी सर्वत्र जल्लोषाचं वातावरण दिसून आलं. शिवाजी पार्ककडे येणारे सगळे रस्ते गर्दीने भरले तर ज्या ठिकाणी सर्वजण जमले तिथे ए. आर. रेहमानची गाणी लागताच सगळं वातावरण भारुन गेल्याचं चित्र दिसून आलं.

तरूणाई जमलेल्या ठिकाणी ए. आर. रहमानचं वंदे मातरम गाणं लागलं, गाणी ऐकू येताच हातातील तिरंगा उंचावून तरूणाई त्यावरती नाचू लागली. या सामान्य जनतेचा जल्लोष आता शिवाजी पार्क मैदानात होताना पाहायला मिळाला. गंमत मधी हे वाक्य मागच्या वर्षभरापासून या देशाला, या राज्याला भुरळ घालतेय आणि ते वाक्य आताही पाहायला मिळतंय आपल्याला मोठमोठे गार केले गंमत मधी.

## भारताने जिंकली टी-२० मालिका

# झिम्बाब्वेला ३-० ने व्हाईटवॉश!

**हरारे (वृत्तसंस्था)** – भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारतीय संघाने झिम्बाब्वेवर ३५ धावांनी विजय मिळवला आहे. या विजयासह भारतीय संघाने झिम्बाब्वेचा ३-० ने व्हाईटवॉश केला आहे. या सामन्यात १५ वर्षांच्या वैभवने झिम्बाब्वेच्या गोलंदाजांना धू-धू धुतले. त्याने ४९ चेंडूंमध्ये ८१ धावांची स्फोटक खेळी करत सर्वांचे लक्ष्य वेधले आहे. आठ चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर त्याने ८१ धावांची खेळी केली.

कर्णधार श्रेयस अय्यरने या सामन्यात नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. वैभव सूर्यवंशीने आक्रमक फलंदाजी करत पहिल्याच षटकात १७ धावा ठोकल्या. मात्र मुजरबानीने दुसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडुवर अभिषेकला बाद करत भारताला पहिला झटका दिला. यानंतर वैभव आणि ईशान चांगली भागीदारी केली. भारताने पॉवरप्लेमध्ये ६३ धावा केल्या. वैभवने या सामन्यात आठ चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ४९ चेंडुमध्ये ८१ धावांची स्फोटक खेळी केली. यानंतर ईशान किशनने २९ धावांची, तर कर्णधार श्रेयस अय्यरने १८ चेंडूमध्ये २७ धावांची खेळी केली. शेवटी रिंकू सिंहच्या २५ धावांच्या उपयुक्त खेळीच्या जोरावर भारताला झिम्बाब्वेला १९३ धावांचे लक्ष्य देता आले. झिम्बाब्वेसाठी ब्रॅड इव्हान्सनने सर्वाधिक २ बळी घेतले.

## 'गोदातीर समाचार'च्या बातमीचा इम्पॅक्ट

# अखेर ११ कोटी रुपयांच्या 'त्या' वाळू साठ्याचा होणार लिलाव


गोदातीर समाचार
epaper.godateer.com
21 Jul 2026 - Page 1
रहाटी शिवारात वाळूमाफियांचा धुडगूस; शासनाचा महसूल बुडवून डोंगरासारखे ढीग साचले


| लिलावासाठी उपलब्ध रेतीसाठा | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | शासकीय रेती डेपो | रेतीसाठा | हातची किंमत प्रति ब्रास | एकूण हातची किंमत |
| १ | रहाटी (जुने वाघी) | ३८,७१२ ब्रास | भाव २,७६७ किंमत | १० कोटी ७१ लाख १६,१०४ रुपये |
| २ | खुपसरवाडी | १,००५ ब्रास | भाव २,७६७ किंमत | २७ लाख ८०,८३५ रुपये |

**नांदेड (प्रतिनिधी)**– तालुक्यातील शासकीय डेपोमध्ये शिल्लक असलेल्या वाळू साठ्याचा लिलाव गुरुवार, दि. ३० जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा लिलाव उपविभागीय अधिकारी कार्यालय येथील सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. रहाटी येथील वाळूसाठ्याचे वृत्त 'दैनिक गोदातीर समाचार'ने २१ जुलै रोजी सचित्र प्रकाशित केल्यानंतर महसूल प्रशासनाने तातडीने वाळू साठ्यांचा लिलाव जाहीर केला आहे. लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या इच्छुकांनी ओळख-पत्रासह विहित तारखेला वेळेवर उपविभागीय अधिकारी कार्यालय, नांदेड येथे हजर रहावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी केले आहे.





**नांदेड** – जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी रविवारी मतदान पार पडले. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी अर्धापूर येथील मतदान केंद्रावर आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, सभापती संजय देशमुख लहानकर, भाऊराव कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, धर्मराज देशमुख आदींची उपस्थिती होती. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी कंधार येथे मतदान केले. यावेळी या निवडणुकीत बिनविरोध विजयी झालेल्या त्यांच्या कन्या प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांनीही मतदान केले. तर विधान परिषदेचे आ. अमर राजूरकर यांनी नांदेड येथे मतदानाचा हक्क बजावला. **(छाया : करणसिंह बैस)**




# 'आषाढी'ला 'कार्तिकी'चे सूर बरसले

## आषाढी महोत्सवात भक्तिरसाची अविस्मरणीय पर्वणी




(छाया –करणसिंह बैस / नरेंद्र गडप्पा)

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या आषाढी महोत्सवात शनिवार, दि. २५ जुलै रोजी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह भक्तिरसाने भारावून गेले. सुप्रसिद्ध गायिका, सारेगमप महाविजेती कार्तिकी गायकवाड-पिसे आणि गौरव महाराष्ट्राचा महाविजेता कौस्तुभ गायकवाड यांच्या सुरेल अभंगांनी उपस्थित नांदेडकरांना अक्षरशः भक्तीच्या सागरात चिंब भिजवले.

'विठू माऊली तू माऊली जगाची...', ''ळी वाजवावी गुढी उभी राहिली...' तसेच 'खेळ मांडियेला वाळवंटी घाई, नाचती वैष्णव भाळी रे...' यांसारख्या अभंगांच्या सादरीकरणाने सभागृहात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. प्रत्येक अभंगाला उपस्थित श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.

महासोहळ्याचे उद्घाटन काँग्रेस दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय सचिव रेहाना चिश्ती, माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, ह.भ.प. भाऊसाहेब पावडे महाराज, ज्येष्ठ काँग्रेस नेते हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, प्रा. यशपाल भिंगे, सुरेश गायकवाड, सुरेंद्र घोडजकर, श्रावण रॅपनवाड, स्मिता शहापूरकर, डॉ. दिनेश निखाते, अब्दुल हफीज, तिरुपती कोंढेकर, अब्दुल गफ्फार, एकनाथ मोरे, आनंद चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात आयोजक विठ्ठल पावडे यांनी आषाढी महोत्सवाची भूमिका स्पष्ट करताना वारकरी संप्रदायाने बालपणापासून आपल्या जडणघडणीवर केलेले संस्कार सांगितले. वारकरी संप्रदाय हा सर्व जाती-धर्मांना एकत्र आणून सामाजिक समतेचा संदेश देणारा असल्याचे त्यांनी नमूद केले. हा महोत्सव सर्वांचा असून आपले प्रेम व आशीर्वादच मला दरवर्षी हा उपक्रम राबविण्याची प्रेरणा देतात, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सचिव रेहाना चिश्ती यांनी आपल्या मनोगतात मराठवाडा ही संतांची भूमी असून सांस्कृतिक ऐक्याचे प्रतीक असल्याचे सांगितले. नांदेडसारख्या पवित्र भूमीत अशा भक्तिमय कार्यक्रमाला उपस्थित राहणे हा आनंददायी अनुभव असल्याचे त्यांनी नमूद केले. उद्घाटक खा. रवींद्र चव्हाण यांनी आयोजक विठ्ठल पावडे यांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे कौतुक करताना, मानवता धर्माला केंद्रस्थानी ठेवून समाजाला एकत्र आणणारे कार्यक्रम आयोजित करणारे व्यक्तिमत्त्व फार दुर्मिळ असते, असे गौरवोद्गार काढले.

# भायखळा पोलीस ठाण्याच्या पहिल्या मजल्यावर आग

**मुंबई (प्रतिनिधी)** –मुंबईतील भायखळा पोलीस ठाण्यात रविवारी रात्री आग लागल्याची घटना घडली. ही आग पोलीस ठाण्याच्या पहिल्या मजल्यावर लागल्याची माहिती मिळाली असून, सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाल्याची नोंद नाही.

प्राथमिक माहितीनुसार, रात्री सुमारे ८:२४ वाजण्याच्या सुमारास भायखळा पूर्व येथील हंसराज मार्गावरील भायखळा पोलीस ठाण्यात आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. त्यानंतर अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल, बेस्ट, मुंबई पोलीस आणि संबंधित विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. सर्व यंत्रणांनी संयुक्तपणे आग विझवण्याचे आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे काम हाती घेतले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# पेपरफुटीवर कठोर कायदा हवाच

देशात गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया आणि शैक्षणिक परीक्षां-मध्ये वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांनी लाखो विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत केला आहे. अनेक वर्षे कठोर परिश्रम करून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य काही स्वार्थी आणि भ्रष्ट प्रवृत्तीच्या लोकांमुळे धोक्यात आले. अशा पार्श्वभूमीवर परीक्षा पेपरफुटी प्रकरणांवर कठोर शिक्षा, जलदगती न्यायालये (फास्ट-ट्रॅक कोर्ट) आणि कडक कायद्याची तयारी करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आणि काळाची गरज आहे. पेपरफुटी हा केवळ एक गुन्हा नसून तो देशाच्या शिक्षणव्यवस्थेवरील विश्वासाला तडा देणारा गंभीर सामाजिक अपराध आहे. एका पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या महिनोन्महिन्यांच्या अथक परिश्रमावर पाणी फिरते. परीक्षांची पुनरावृत्ती करावी लागते, सरकारी यंत्रणेवर आर्थिक भार वाढतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनात प्रामाणिकपणाबद्दलचा विश्वास कमी होतो. मेहनतीपेक्षा गैरमार्ग अधिक प्रभावी ठरतो, असा चुकीचा संदेश समाजात जातो. अलीकडच्या काळात नीट, विविध भरती परीक्षा, राज्य लोकसेवा आयोगांच्या परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षांमध्ये पेपरफुटीच्या अनेक घटना समोर आल्या. या घटनांमुळे विद्यार्थ्यांनी देशभरात आंदोलन केले. अनेकांनी नैराश्याचा सामना केला, तर काही विद्यार्थ्यांचे वयोमर्यादेचे नुकसानही झाले. या घटनांनी शिक्षण व्यवस्थेतील सुरक्षेतील त्रुटी उघड केल्या. यापुढे पेपरफुटी करणाऱ्यांवर कठोर कारवाईसह जलदगती न्यायालयांमार्फत अल्पावधीत निकाल देण्याची व्यवस्था निर्माण झाली, तर गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण होईल. अनेकदा अशा प्रकरणांमध्ये तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया वर्षानुवर्षे सुरू राहते. त्यामुळे आरोपींना शिक्षा होण्यास विलंब होतो आणि त्याचा प्रतिबंधात्मक परिणामही कमी होतो. फास्ट-ट्रॅक न्यायालये ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी करू शकतात. मात्र केवळ कठोर कायदा करून प्रश्न सुटणार नाही. परीक्षा प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून वितरणापर्यंतची संपूर्ण साखळी डिजिटल सुरक्षेखाली आणणे, संबंधित कर्मचाऱ्यांची कठोर पडताळणी, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देखरेख, सायबर सुरक्षा आणि उत्तरदायित्व निश्चित करणे तितकेच आवश्यक आहे. तसेच पेपरफुटीमध्ये सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांवर, मध्यस्थांवर आणि संस्थांवरही समान कठोर कारवाई झाली पाहिजे. विद्यार्थ्यां-मध्ये प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्ये रुजविणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यश मिळविण्यासाठी शॉर्टकटचा मार्ग स्वीकारणाऱ्या प्रवृत्तीला समाजानेही नाकारले पाहिजे. पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे पारदर्शक परीक्षा व्यवस्थेची उभारणी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. केंद्र सरकारचा कठोर कायदा आणि फास्ट-ट्रॅक न्यायालयांचा प्रस्ताव हा विद्यार्थ्यांच्या हिताचा आणि शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो. मात्र या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, निष्पक्ष तपास आणि कोणालाही राजकीय किंवा प्रशासकीय संरक्षण न देणे हीच त्याच्या यशाची खरी कसोटी असेल. देशाच्या विकासाचा पाया गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि गुणवत्तेच्या आधारे मिळणाऱ्या संधींवर उभा असतो. त्यामुळे पेपरफुटी करणाऱ्यांविरुद्ध शून्य सहनशीलता हे धोरण केवळ घोषणेत न राहता प्रत्यक्षात उतरले, तरच लाखो विद्यार्थ्यांचा न्याय, त्यांचे परिश्रम आणि देशाच्या शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता कायम राहील.

# मिसाईल मॅन: डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम!



२७ जुलै भारताचे थोर शास्त्रज्ञ, मिसाईल मॅन आणि लोकप्रिय माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा आठवा स्मृतिदिन. त्यांनी भारतवासीयांना स्वप्ने पाहायला शिकविले. 'स्वप्ने बघा, त्यांचा ध्यास घ्या आणि ते प्रत्यक्षात उतरणार याबद्दल विश्वास बाळगा' हा मंत्र त्यांनी दिला. भारताच्या अवकाश संशोधन आणि क्षेपणास्त्र निर्मिती कार्यक्रमातील त्यांची कामगिरी अजोड आणि अतुलनीय अशी आहे. तरुण संशोधकांना हाताशी घेऊन संपूर्णतः स्वदेशी बनावटीच्या 'अग्नि', 'पृथ्वी', 'आकाश', 'नाग' आणि 'त्रिशूल' अशा दीर्घ पल्ल्याच्या प्रखर क्षेपणास्त्रांची निर्मिती करून भारतास क्षेपणास्त्रांच्या बाबतीत स्वयंपूर्ण आणि सामर्थ्यवान बनवले. त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांचे बलशाली, संपन्न, विज्ञाननिष्ठ आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करूया.

सुमारे १९४१ चा काळ. रामेश्वरमच्या समुद्रकिनारी दहा वर्षाचा एक छोटा मुलगा मान अवघडेपर्यंत सीगल पक्षी व बगळे आकाशात कसे भरारी घेतात, हे उत्सुकतेने पाहात असे. पक्षांच्या भरारीमागचे गूढ आपणांस उकलावे आणि आपणासही त्यांच्याप्रमाणे आकाशात विहार करता यावा अशी पराकोटीची इच्छा त्यास होत असे आणि खरोखरच एक दिवस आकाशाचेच पंख करून या मुलाने अशी भरारी घेतली की सारे जग स्तिमित झाले. हा छोटा मुलगा म्हणजे डॉ. अबुल पाकीर जैनुलाबद्दीन अब्दुल कलाम, भारताचे थोर शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती होय.

डॉ. अब्दुल कलामांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तमिळनाडूतील रामेश्वरम या छोट्याश्या गावात झाला. आई आशियाम्मा आणि वडील जैनुलाबद्दीन दोघेही धार्मिक. त्यांची शिकवण, शिवाय रामेश्वरम हे तीर्थक्षेत्र असल्याने तेथील पवित्र वातावरण आणि तिथल्या शिवमंदिराचे पुजारी लक्ष्मणशास्त्री या सर्वांचे संस्कार त्यांच्या बालमनावर खोलवर रुजले. अल्पशिक्षित वडिलांच्या विचारांचा वारसा डॉ. कलामांना त्यांच्या जीवनातील मोक्याच्या प्रसंगी दीपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरला. ते लहानपणी शमशुद्दीन या त्यांच्या भावाला रामेश्वरममध्ये घरोघरी वर्तमानपत्रे वाटण्यास मदत करीत असत. बालपणीचे शिक्षण रामेश्वरममध्ये पूर्ण केल्यानंतर कलामांना रामनाथपूरममधील श्वार्झ हायस्कूलमध्ये श्यादुराई सालोमान हे पितृतुल्य गुरु मिळाले. त्यांनी तरूण कलामांच्या मनात स्वप्ने बघण्याचे, त्यांचा ध्यास घेण्याचे आणि आत्मविश्वासाचे बीज पेरले. त्यानंतर तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेज- मधून त्यांनी पदार्थविज्ञान विषयाची पदवी घेतली व पुढे व्यावसायिक शिक्षणासाठी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीमध्ये विमान-बांधणीशी संबंधित वायुगतीशास्त्र (एरोडायनामिक्स) शाखा निवडली. या ठिकाणी त्यांनी प्रा. स्पॉडर, प्रा. पंडलाई, प्रा. नरसिंहराव, प्रा. श्रीवर्धन, आदी अनेक विद्वान गुरूंकडून विमान-



बांधणीतील बारकावे आत्मसात केले. त्यानंतर वैमानिक बनण्याची संधी हुकल्यानंतर १९५८ मध्ये संशोधक पदावर असताना कलाम व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'नंदी' या संपूर्ण भारतीय बनावटीच्या हॉवरक्राफ्टची निर्मिती केली. यामुळे त्यांची अवकाश संशोधन संस्थेत रॉकेट अभियंता म्हणून नेमणूक झाली. १९६२ मध्ये थुंबा येथे अवकाशतळ उभारणीमध्ये कलामांचा सहभाग होता. संस्थेतर्फे ते विशेष प्रशिक्षणासाठी अमेरिकेत 'नासा' येथे गेले. २१ नोव्हेंबर १९६३ मध्ये भारताने अवकाशात पाठविलेल्या 'नाईकेआपाची' या पहिल्या अंतराळयानाच्या प्रकल्पात कलामांची महत्वपूर्ण भूमिका होती. याशिवाय डॉ. विक्रम साराभाईच्या मार्गदर्शनाखाली रोहिणी या रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण २० नोव्हेंबर १९६७ ला केले तर यानंतर अल्पावधीतच 'रॉकेट असिस्टेड टेक ऑफ सिस्टीम' (राटो) म्हणजे एखाद्या कमी लांबीच्या धावपट्टीवर रॉकेटच्या साहाय्याने लढाऊ विमानांना अपेक्षित वेग देण्याचे तंत्र विकसित केले. १९६९ मध्ये साराभाईनी त्यांच्यावर उपग्रह प्रक्षेपक वाहनाच्या (एसएलव्ही) निर्मितीमधील महत्वाची जबाबदारी सोपविली.या दरम्यान त्यांच्यावर अनेक कौटुंबिक संकटे (मेहुणा व मित्र जलालुद्दीनचे निधन) कोसळली. तथापि, त्यांनी एस.एल.व्ही. चे चारही टप्पे कार्यरत करून रोहिणी उपग्रहाला योग्य कक्षेत पाठविण्यात यश मिळविले. भारतीय संसदेने व तत्कालीन पंतप्रधान इंदिराजींनी त्यांचे अभिनंदन केले.

एस.एल.व्ही.च्या यशानंतर क्लामांच्यावर भारताचे पहिले क्षेपणास्त्र तयार करण्याची जबाबदारी सोपविली. जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे 'पृथ्वी', 'त्रिशूल', आकाशातून जमिनीवरील लक्षाचा वेध घेणारे 'आकाश' , रणगाडा उद्ध्स्त करणारे 'नाग' आणि आंतरखंडीय 'अग्नी' या क्षेपणास्त्रांच्या निर्मितीमध्ये कलामांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली. क्षेपणास्त्रनिर्मितीने भारताच्या सामर्थ्याची सर्व जगाला जाणीव झाली आणि क्षेपणास्त्रसज्जतेमुळे भारताचा जगात दबदबा वाढला.

तरुणांना प्रेरित करण्यासाठी त्यांनी 'अग्निपंख' हे आत्मचरित्र, तर तरुणांचे देशप्रेम जागविण्या साठी 'इग्नायटेड माइंड' हे पुस्तक लिहिले असून 'दि लाइफ ट्रि' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. अकरावे राष्ट्रपती म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी देशाला २०२० मध्ये जागतिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न दिले. त्याकरिता विविध क्षेत्रात गाठावयाच्या उद्दिष्टांचा पुस्तकरूपी अहवाल इंडिया २०२०' उपलब्ध आहे. डॉ. कलामांना अनेक पुरस्कार मिळाले असून देश व परदेशातील अनेक संस्थांचे ते सन्माननीय सदस्य होते. सुमारे ३० महत्वाच्या विद्यापीठांनी त्यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स', 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी', 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' सारख्या मानाच्या पदव्या दिल्या आहेत. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण (१९८१), पद्मविभूषण (१९९०) आणि 'भारतरत्न' (१९९७) या सर्वोच्च नागरी पुरस्कारांनी गौरविले आहे.

आयुष्यभर विद्यार्थ्यांना दिशा देण्याचे काम करणाऱ्या कलामांना आपल्या देशातील तरुणांच्या बद्दल खूप विश्वास होता. म्हणूनच त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुस्तक प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन आदी विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासूवृत्ती निर्माण करणारे उपक्रम आयोजित करून त्यांचे स्मरण केले पाहिजे.

**-प्रा. विजय कोष्टी**
कवठेमहांकाळ, जि. सांगली

# क्रियेविण वाचाळता व्यर्थ!

कर्मवीर भाऊराव पाटलांनी कमवा आणि शिका ही योजना विद्यार्थ्यांसाठी सुरू केली. त्यामुळे त्यांना परिश्रमाचे महत्त्व कळाले. महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होऊन विद्यार्थ्यांना परिश्रमाचे महत्त्व सांगितले जाते व प्रत्यक्ष कार्य करून घेतले जाते. त्यामुळे परिश्रम काय आहेत हे लहानपणीच विद्यार्थ्यांना कळते.

प्रत्येक मनुष्यांनी अगोदर आपले महत्त्वाचे कार्य म्हणजे परिश्रम करावे, आणि नंतरच सांगत बसावे. व्यर्थ बडबड करू नये. ही बडबड आपली वाया जाते. अखिल मानवाच्या कल्याणासाठी अनेक उपदेशपर सुवचने संतांनी सांगितलेली आहेत. आधी करा, मग सांगा.. असा संदेश आपल्या पूर्वजांनी आपल्याला दिलेला आहे. अलीकडच्या काळात बालिश बहु बायकात बडबडला असे म्हणतात. कारण तो कार्य करत नव्हता. फक्त बायकांमध्ये व्यर्थ बडबड करत बसत, त्यामुळे त्याचे व्यक्तिमत्व उठून दिसत नव्हते. व्यक्तीच्या बोलण्याला कृतीची जोड असावी.

महात्मा ज्योतिबा फुले हे कृतीवीर होते. म्हणून त्यांनी समाजाला अज्ञानातून अंधश्रद्धेतून बाहेर काढून पुरोगामी विचाराकडे आणले. कारण नुसतं बोलून काही होत नाही.आपल्या कृतीला समाजात मान-सन्मान मिळतो आणि सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते. केवळ पोपटासारखं बोलून आपल्यात सुधारणा होत नसतात. गप्पा मारणाऱ्या व्यक्तीचे समाजात हसू होते. तो कोणाच्याही कामी कधीही पडत नाही. फुकट्या असे त्यांना म्हटले जाते. म्हणून आपण समाजात कोणाच्या तरी उपयोगी पडावे; तरच आपले जीवन सार्थकी लागले असे म्हणता येईल. बाष्कळ गप्पा मारणाऱ्या व्यक्तीवर कोणीच विश्वास ठेवत नाहीत.

माणसाने नेहमी कणभर बोलावे आणि मणभर करावे, असे म्हटले जाते. कण म्हणजे अतिशय लहानातली लहान गोष्ट आणि मण म्हणजे अतिशय मोठे कार्य असा त्याचा अर्थ आहे. अलीकडच्या काळामध्ये फक्त गप्पा मारण्याची सवय अनेक तरुणांना सुद्धा झाली आहे. मी काय काय केलं? किती परिश्रम केले?. अशी फुशारकी बरेचजण आपल्या मित्र-मैत्रिणीजवळ मारतात. परंतु आपण किती कमावलं हे सांगत नाहीत. सर्व संपत्ती ही आई-वडिलांची आहे. आपले काही नाही आपण त्यांचे सेवा करून वार्धक्यानंतर ती आपल्याकडे आपोआप येते. परंतु आज काही काम न करणारे मुलं अनेक ठिकाणी आई-वडिलांच्या जीवावर ऐतखाऊ बनले आहेत. काम करत नाहीत. त्यांचं जीवन संघर्षमय नाही. त्यांना पैशाचे महत्व कळत नाही. ज्याने समाजामध्ये मिसळून समाजाला प्रतिगामी विचाराकडून पुरोगामी विचाराकडे आणले. त्यांनाच खरे शूर मानूया..

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत चोखामेळा, संत सोयराबाई, संत बंका, संत निर्मळा बाई, संत भगवान बाबा, शाहीर अण्णाभाऊ साठे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज या महान विभूतींनी आपल्या कार्यातून जगाला ज्ञान देण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच सर्व वरील आपले आदर्श व्यक्ती आहेत. बोलाची भात, आणि बोलाची कढी कुठेही करून दिली जात नाही. काळजीपूर्वक आपण मोठे व्हायचं असेल तर सर्वसामान्यांना धरून मोठे व्हावे लागते. नुसती आगपाखड करू नये. जो तो आपल्या प्रयत्नाने मोठा होत असतो. इतरांना वाईट वाटण्याचं काहीच कारण नाही. फक्त बडबड करून कोणतीच गोष्ट पूर्णत्वाला जात नाही. उलट सामाजिक बांधिलकी सोडून आपण वेगळ्या दिशेला जातो. त्यामुळे समाजात बदनामी होते. समाजात सध्या पण अनेक उदाहरण पाहत आहोत. गोरगरिबाला लुटून किंवा त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन देवाधर्माची भीती दाखवून त्यांना फसवलं जाते.

हे कधीही उघडकीस येते. कामधंदा केल्याशिवाय पर्याय नाही. बोले तैसे चाले। त्याची वंदावी पावले, असे म्हणतात. आज बऱ्याच जणांना कार्य नको आहे. फक्त फोटो काढले, काम समाप्त झाले असे म्हणतात. कर्तृत्वसंपन्न, कर्तृत्ववान, ध्येयवादी, कर्मयोगी बनायचे असेल तर? तुम्हाला परिश्रमाशिवाय गत्यंतर नाही. तुम्ही प्रत्येकासोबत चांगले वागा. दया, क्षमा, शांती यांची शिकवण द्या. समतेचा संदेश जनतेला द्या. रंजल्यागांजलेल्यांना जवळ करा. दीनदुबळ्यांना आधार द्या. तेव्हाच तुमच्या वाचेला महत्त्व राहील. तुम्ही फक्त वाचा वीर होऊ नये. कृती करा, चळवळ करा, अखंड चळवळ करा, असे दादाभाई नवरोजी आपल्या देश बांधवांना सांगत असत. समाज-सेवक बाबा आमटे यांनी संपूर्ण आयुष्य कुष्ठरोग्यांची सेवा करण्यात घालवली. त्यांचा आदर्श घ्या, महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आयुष्यभर परिश्रम केले. त्यामुळे त्या भारतातील सर्वोच्च पदाला पोहोचल्या. सांगण्याचा एकच अर्थ आहे की, माणूस कष्टातून मोठा व्हावा. आयत्या पिठावर रेगोट्या मारू नये. त्यामधून समाधान मिळत नाही. काही लोकांना काम करू वाटत नाही, जिथे फुकट मिळाले की तिथे जाऊन बसावे वाटते. त्यामुळेच 'आयत्या बिळात नागोबा' असे म्हणतात. या जीवनात आपण येऊन चांगलीच कार्य करावे, अन्यथा चुकीच्या कार्याला येथे माफी नाही. भले मोठमोठे आले आणि मातीत मिसळले. नेहमी महिलांचा सन्मान करावा.काही महिला अज्ञानी असून सौंदर्यवान आहेत; म्हणून त्यांच्यावर अन्याय-अत्याचार, करू नये.

अंधश्रद्धेच्या नावाखाली फसवणूक करू नये. निष्पाप महिलांना आपल्या जाळ्यात ओढू नये. पाप करणाऱ्याला शिक्षा होणार म्हणजे होणारच? ही काळ्या दगडावरील पांढरी रेष आहे. 'शिका', संघटित व्हा, आणि संघर्ष करा. पुस्तके वाचा. तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाचे तुम्ही पुस्तक घ्या. ते तुम्हाला जगण्यासाठी मदत करेल. पुस्तकावर प्रेम करा. तेव्हाच तुमच्या आयुष्यात सुधारणा होतील. आपला वेळ बोलण्यात वाया घालू नका. आपल्याकडे ज्ञान असल्याशिवाय आपल्या शब्दाला किंमत येत नाही. त्यासाठी ज्ञानवंत व्हावे, हे सर्व करण्यासाठी तुम्हाला परिश्रमाची गरज आहे. असे महान विचार आपल्या विश्वरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी विश्वाला दिले. म्हणून वाचाळ बडबड उपयोगाची नाही.

तुफानातील दिवे होऊन जीवन जगा. त्यावेळेस लोक तुमच्याकडे येतील. तुमच्या नावाचा जयजयकार करतील. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वतः चरख्यावर कापड विणायचे. फुकट खायाचे नाही असे ते म्हणत असत. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री कै. आर. आर. पाटील यांनी सुद्धा परिश्रमाने तेथपर्यंत पोहोचले. ऑलम्पिक स्पर्धेमध्ये भाग घेणारे खेळाडू भरपूर परिश्रम करून देशाला सन्मानाने पदके मिळवून देतात. ही गोष्ट सोपी नाही. म्हणून तरुणांनो, चला उठा.. परिश्रमाची तयारी ठेवा. तेव्हाच तुम्ही उंच भरारी घेऊ शकता. आकाशात भरारी घ्यायची असेल तर गरुडाच्या पंखाची गरज आहे. म्हणून स्वप्न मोठे ठेवा. स्वप्न अशी पहा की, ती तुम्हाला झोप लागू देत नाहीत. असे अग्निपंख ग्रंथाचे लेखक, शास्त्रज्ञ, माजी राष्ट्रपती, भारतरत्न ए.पी. जे अब्दुल कलाम यांनी तरुणांना उद्देशून सांगितले आहे. त्यामुळे बाष्कळ बडबड बंद करा, आणि आपला देश महासत्ता बनण्याच्या दृष्टीने अखंड परिश्रम करत चला. परिश्रमाला प्रथम प्राधान्य द्यावे.

**-प्रा. बरसमवाड विठ्ठल गणपत**
अध्यक्ष :विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी, ता. मुखेड, जि.नांदेड

# मुखवटा आधुनिकतेचा, विळखा विकृतीचा

आज आपण २१ व्या शतकातील प्रगत भारतात जगत आहोत. तंत्रज्ञान वाढलं, आर्थिक सुबत्ता आली आणि हातामध्ये महागडे स्मार्टफोन आले. पण या चमकत्या दुनियेच्या मागे एक काळोखं वास्तव वेगाने पसरत चाललं आहे. वरवर पाहता आपण प्रगती करत असल्याचा आव आणत असलो, तरी आतून आपली सामाजिक, कौटुंबिक आणि नैतिक वीण पूर्णपणे विस्कटत चालली आहे. आज अशी वेळ आली आहे की, आपण स्वतःला आरशात पाहून एक प्रामाणिक प्रश्न विचारला पाहिजे, आपण नक्की कुठे चाललो आहोत?

**सुखाचा आभास, स्टेट्सचा दिखावा आणि तुटणारी कुटुंबं**

आपलं सुख आपल्या घरातच असतं, हे आपल्या पूर्वजांनी सांगून ठेवलेलं त्रिकालाबाधित सत्य. पण आजच्या आधुनिक जगात हे सत्यच पूर्णपणे धुसर होत चाललंय. माणूस सुखाच्या शोधात आयुष्यभर घराबाहेर धावत असतो. बाहेरच्या जगात त्याला प्रेम दाखवणारे अनेक जण भेटतात. पण विचार करा, या दाखवल्या जाणाऱ्या प्रेमात पूर्वीच्या पिढीसारखा निखळ भाव, ओलावा आणि निरपेक्ष जिव्हाळा खरोखरच उरला आहे का? की त्यामागे केवळ स्वतःचा काहीतरी स्वार्थ किंवा व्यावसायिक फायदा आहे? आज बाहेर मिळणारे बहुतांश संबंध हे वापरा आणि फेका या तत्त्वावर चालत आहेत.

याहूनही मोठी शोकांतिका म्हणजे सोशल मीडियावरील स्टेटस आणि रील्सचा जीवघेणा दिखावा. आपण मोबाईलवर जे सुखी, आनंदी आणि समाधानी असल्याचं स्टेटस ठेवतो, ते फक्त जगाला दाखवण्यासाठी असतं का? आज माणूस एकमेकांचे स्टेटस बघून, केवळ चढाओढ (घमेंड) आणि दिखावा करण्यासाठी स्वतःचे स्टेट्स ठेवत आहे. पण खरी परिस्थिती डोकावून पाहिली तर लक्षात येतं की, जितकं स्टेट्स रंगेबेरंगी आणि सुखी असतं, तितकंच त्या माणसाचं वैयक्तिक आयुष्य आतून पोखरलेलं आणि एकटं असतं. या आभासी दुनियेच्या शर्यतीत आपण भविष्यात स्वतःचं किती मोठं मानसिक आणि कौटुंबिक नुकसान करून घेत आहोत, याची जाणीव सुद्धा आपण विसरत चाललो आहोत. याच दिखाव्याचा आणि संवादाच्या अभावाचा परिणाम आज आपल्या कौटुंबिक व्यवस्थेवर होतोय. समाजात घटस्फोटांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. ज्या घरात सुख असायला हवं, तिथलेच सदस्य एकमेकांच्या सुखात बाधा आणू लागले आहेत.

संवाद संपलाय आणि त्याची जागा अहंकार, अवाजवी अपेक्षा आणि अविश्वासाने घेतली आहे. घराचं रूपांतर केवळ लॉजमध्ये झालंय, जिथे लोक फक्त झोपायला येतात.

**कायद्याचा संपलेला धाक:** माणुसकीचा अंत आणि क्रूरता जेव्हा माणसाच्या मनातून नैतिक मूल्यं संपतात आणि सोशल मीडियाचा आभास डोक्यात शिरतो, तेव्हा तो क्रूर बनतो. आज सम ाजात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, माणूस माणसाचा जीव घ्यायला एका सेकंदाचाही विचार करत नाही. अगदी किरकोळ कारणावरून किंवा क्षणिक रागातून एकमेकांचे जीव घेतले जात आहेत. हे सगळं करताना गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा कोणताही धाक किंवा भीती उरलेली नाही, असं स्पष्ट दिसतंय.

आज आपण स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे की, आपली माणुसकी नेमकी कुठे गेली आहे? पूर्वी समाजात एकमेकांबद्दल एक आदर, एक भीती असायची. आज भरदिवसा गुन्हे घडतात आणि लोक वाचवण्याऐवजी त्याचे व्हिडिओ काढण्यात व्यस्त असतात. धक्कादायक बाब म्हणजे, गुन्हेगारीचा अभ्यास केला तर लक्षात येतं की, समाजात गुन्हे करणाऱ्यांमध्ये नशा करणाऱ्यांपेक्षा नशा न करणारे, सुजाण आणि सुशिक्षित लोक जास्त आहेत. मग मूळ मुद्दा नशा हा आहे की माणसाची बदलत चाललेली विकृत मानसिकता? आजच्या घरातील आदर्श, आई-वडिलांचे संस्कार आणि नैतिक मूल्ये संपत चालली आहेत, हे यामागचं खरं कारण आहे. त्यातच सोशल मीडियावर गुन्हेगारीचे उदात्तीकरण सुरू आहे. गुन्हा करून त्याचे रील्स बनवणे, भाईगिरी दाखवणे याला आजचा तरुण वर्ग कूल समजतोय.

कोसळणारे आदर्श, शॉर्टकटची हाव आणि कोवळी पावलं घरातून संस्कारांची घसरण सुरू झाली की समाजात विकृती कशा पसरतात, याचं जळजळीत उदाहरण म्हणजे आजची तरुण पिढी. आज अमली पदार्थांच्या आहारी जाणाऱ्यांमध्ये मायनर्स म्हणजेच अल्पवयीन मुला-मुलींचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. जी औषधं माणसाचं आरोग्य सुधारण्यासाठी, डॉक्टरांच्या सल्ल्याने जीव वाचवण्यासाठी बनवली गेली आहेत (उदा. विविध कफ सिरप किंवा पेनकिलर्स), त्यांचा वापर आजची कोवळी पिढी केवळ नशा म्हणून करत आहे. आजच्या तरुण पिढीत कष्टापेक्षा झटपट श्रीमंत होण्याची हाव निर्माण झाली आहे. ऑनलाइन बेटिंग ॲप्स, सट्टा जुगार किंवा गुन्हेगारीच्या माध्यमातून एका रात्रीत कोट्यधीश होण्याचे स्वप्न तरुण पाहत आहेत. जेव्हा घरातील जुने आदर्श संपतात आणि पैशाला संस्कारांपेक्षा जास्त महत्त्व दिलं जातं, तेव्हा सुशिक्षित डोकीसुद्धा विकृत गुन्हेगारीकडे वळतात. या विकृत म ानसिकतेचा कळस कुठे होतो? तर जिथे चक्क नवजात बालकांचे रेट कार्ड ठरवून त्यांची मानवी तस्करी केली जात आहे. मुलाचा रंग कोणता, लिंग कोणतं, यानुसार पैशांचे आकडे ठरवले जातात. ज्या देशात लहान मुलांना देवाचं रूप मानलं जातं, तिथेच जन्माला येणाऱ्या नवजात जिवाचा व्यापार व्हावा? हा आपला संस्कृतीप्रधान भारत आहे की माणुसकी संपलेला भारत?

**दोष देण्याची फॅशन की पालकांचे अपयश?**

आजची आपली सर्वात मोठी शोकांतिका ही आहे की, आपण सगळेच जण सल्ले देणारे आणि दोष देणारे झालो आहोत. सोशल मीडिया असो की चहाची टपरी प्रत्येक जण सरकारला, कायद्याला, पोलिसांना किंवा सिस्टीमला दोष देण्यात व्यस्त आहे. पण कधी आपण आत्मपरीक्षण करतो का? आजच्या पालकांचेपालकत्व कुठेतरी गंभीरपणे चुकतंय, हे आपण मान्य करणार आहोत का? आजचे आई-वडील मुलांना महागडे फोन, गाड्या, ब्रँडेड कपडे आणि अफाट पैसा द्यायला तयार आहेत; पण त्यांच्याकडे मुलांना देण्यासाठी वेळ आणि संस्कार मात्र उरलेले नाहीत. मुलांच्या हातात लहान वयातच पैसा खेळू लागला, की ते इंटरनेटवर काय पाहतात, सोशल मीडियावर कोणत्या चढाओढीत स्वतःचं भविष्य उद्ध्वस्त करत आहेत, याकडे लक्ष देण्याची तसदी आजचे पालक घेत नाहीत.

आपल्या देशात पुन्हा तीच जुनी माणुसकी, आदर्श, एकमेकांबद्दलचा मान-सन्मान आणि प्रेम परत आणण्यासाठी आपण स्वतः वैयक्तिक पातळीवर खरंच काही करतोय का? की फक्त फेसबुक, व्हॉट्सपवर पोस्ट टाकून आपली जबाबदारी संपली असं मानतोय?

कोण काय करतंय हे बघण्यापेक्षा आणि दुसऱ्याला दोष देत बसण्यापेक्षा, मी माझ्या या अनमोल भारतासाठी, माझ्या समाजासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी काय करणार आहे? हा एकच विचार आज क्रांती घडवून आणू शकतो. बदल हा सिस्टीममधून नाही, तर तो आपल्या स्वतःपासून, आपल्या घरापासून आणि आपल्या मुलांवर होणाऱ्या संस्कारांपासून सुरू होईल.

आपल्या देशाला कायद्यापेक्षा नैतिक मूल्यांच्या, आदराची आणि पैशांपेक्षा माणुसकीची जास्त गरज आहे. जोपर्यंत आपण सोशल मीडियाच्या फेक दुनियेतून बाहेर पडत नाही, जोपर्यंत घरात संवादाचे आणि आदर्शांचे पुनरुज्जीवन करत नाही, तोपर्यंत हे वास्तव बदलणार नाही. चला, केवळ दोष देणारे प्रेक्षक न बनता, या अनमोल भारताला आणि आपल्या संस्कृतीला वाचवणारे सक्रिय नागरिक बनूया!

**-रोहित भोसीकर**
संचालक : भोसीकर फुड्स, नांदेड
मो. ८८०५५७५५५५

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

# जिल्ह्यातील १५८२ गावांमधील एकूण ९६ हजार ९२० पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील १५८२ गावांमधील एकूण ९६ हजार ९२० पात्र शेतकऱ्यांची यादी शासनाच्या पोर्टलवर प्रसिद्ध केली आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांनी दिली आहे.

पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची व अग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहनही हिरे यांनी केले आहे.

या योजनेस मंजुरी मिळाल्यानंतर नांदेड जिल्ह्यातील १५८२ गावांमधील एकूण ९६ हजार ९२० पात्र शेतकऱ्यांची यादी शासनाच्या पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, सीएससी केंद्र, आपले सरकार सेवा (एसएसके) केंद्र, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी जवळच्या 'आपले सरकार सेवा' किंवा सीएससी केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक व बंधनकारक आहे. त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी आपले नाव लाभार्थी यादीत असल्याची खात्री करून अंगठ्याचे प्रमाणीकरण, मूळ आधार कार्ड आणि बचत खात्याचे पासबुक सोबत आणणे आवश्यक आहे.

जिल्हा उपनिबंधक यांनी शेतकऱ्यांना विलंब न करता आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे आवाहन केले असून, अधिक माहितीसाठी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था किंवा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालयाशी संपर्क साधण्यास सांगितले आहे. दरम्यान, राज्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने कर्जमाफीचा लाभ देण्यात येत असून, आधार संलग्नीकरण आणि प्रमाणीकरण आणि अग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करणे ही लाभ मिळविण्याची महत्त्वाची अट असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातही ही प्रक्रिया अजून सुरु असून लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ होईल, असेही हिरे यांनी स्पष्ट केले आहे.

नांदेड तालुका ८४ गावे, ६५८२ शेतकरी, अर्धापूर तालुका ५२ गावे, २४७९ शेतकरी, मुदखेड तालुका ५५ गावे, ३९२५ शेतकरी, हदगाव तालुका १५२ गावे, ६८३९ शेतकरी, किनवट तालुका १८१ गावे, ९०५९ शेतकरी, माहूर तालुका ८८ गावे, २४८१ शेतकरी, हिमायतनगर तालुका ७१ गावे, ३९१९ शेतकरी, भोकर तालुका ८२ गावे, ५९९७ शेतकरी, उमरी तालुका ६६ गावे, ४२६० शेतकरी, धर्माबाद तालुका ५६ गावे, ४१२६ शेतकरी, बिलोली तालुका ९० गावे, ६१७० शेतकरी, नायगाव तालुका ९१ गावे, ७२७५ शेतकरी, देगलूर तालुका ११० गावे, ८५१२ शेतकरी, मुखेड तालुका १५१ गावे, ७८८६ शेतकरी, कंधार तालुका ११८ गावे, ७३५४ शेतकरी, लोहा तालुका १३५ गावे, १००५६ शेतकरी असे जिल्ह्यातील १६ तालुक्यांतील १५८२ गावातील एकूण ९६,९२० शेतकऱ्यांची यादी शासनातर्फे जाहीर करण्यात आली आहे.

# केंद्रीय शिक्षणमंत्री प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर काँग्रेसकडून विजयमार्च



**नांदेड (प्रतिनिधी)** – केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देशातील विद्यार्थी, युवक तसेच विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधीजींच्या दृढ नेतृत्वाला विजय समर्पित करत खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात व महाराष्ट्र सहप्रभारी रेहना चिश्ती, प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर यांच्या विशेष उपस्थितीत तसेच जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकाराने नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने शनिवार, दि. २५ जुलै रोजी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते महात्मा गांधी पुतळा दरम्यान विजयमार्च काढण्यात आला.

देशातील संघटित विद्यार्थी शक्तीमुळे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात आला असून, हा लोकशाहीचा विजय असल्याची प्रतिक्रिया खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी दिली. यावेळी महाराष्ट्र सहप्रभारी रेहना चिश्ती, प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर, महानराध्यक्ष अब्दुल गफ्फार, माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, प्रा. यशपाल भिंगे, सुरेश गायकवाड, सुरेंद्र घोडसकर, श्रावण रॅपनवाड, डॉ. दिनेश निखाते, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, शेख पाशा, अनिल मोरे, गोविंद बाबा गोंड, अजिज कुरेशी, प्रताप देशमुख बारडकर, संजय वाघमारे, सुरेश हाटकर, गणेश ढगे, कुमार कुर्तडीकर, महेश देशमुख तरोडेकर, डॉ. भगवान मनूरकर, दीपकसिंग हुजारीया, बापूसाहेब पाटील, रमेश चित्ते, अब्दुल रहिम, डॉ. बाकी, शंकर शिंदे, आंबादास रातोळे, गणेश कोकाटे, नागराज सुलगेकर, गगन यादव, सुरजीतसिंग तबेलेवाले, नईम शेख, जेशिका शिंदे, सुरज शिंदे, अक्षय नगळे, संदीप देशमुख तरोडेकर, संदीपकुमार देशमुख, गोविंद पाटील, सोनू पाटील, विष्णू पावडे, विलास पावडे, सत्यजित बिराजदार, प्रथमेश पावडे, प्रकाश दिपके, अझहर शेख, कलिम शेख आदींसह इतर काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# सिडको येथील कुसुमताई महाविद्यालयाच्या वारकरी व वृक्षदिंडीने भाविकांचे वेधले लक्ष

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –आषाढी एकादशीनिमित्त कुसुमताई माध्यमिक विद्यालय सिडको येथील पालखी व वृक्षदिंडीने सिडको परिसरातील भाविक-भक्तांचे लक्ष वेधले. यावेळी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेत लहान विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

२५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त कसुमताई प्राथमिक व माध्यमिक महाविद्यालयाच्यावतीने वृक्ष दिंडीसह पालखी सोहळा आयोजित केला होता. यावेळी पालखीचे पूजन सचिव संभाजीराव बिरादार, शाळेच्या मुख्याध्यापिका शशिकला जाधव बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी काढण्यात आलेली वृक्षदिंडी व पालखी सिडकोतील मुख्य रस्त्याने विठ्ठल विठ्ठल हरी ओम विठ्ठला या गीतासह विविध भक्ती गीताने भाविक-भक्तांसह नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. पालखीसोबत लहान मुलींच्या हातात छोटे रोपटे व आकर्षक विठ्ठल-रुक्मिणींची मूर्ती होती.



यावेळी पर्यवेक्षक शेख निजाम गवंडगावकर, शिक्षक विश्वास हंबर्डे, सूर्यकांत वडजे, नरसिंग यमलवाड, युवराज शिंदे, सतीश जाधव पाटील, गंगाप्रसाद, माधुरी माखणे, वंदना सोनाळे आणि शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.

पालखी शाळा परिसरातील मार्गावर काढण्यात आली होती. यावेळी नागरिकांनी व भाविक-भक्तांनी उपस्थित राहून टाळ्यांच्या कडकडाटात पालखीचे स्वागत केले.तर विठ्ठल रुक्मिणी वेशभूषा केलेल्या देखाव्याला भाविक-भक्तांनी साथ दिली.

## समरसता संकल्प अभियानच्या मुख्य संयोजकपदी प्रा. पवार



**नांदेड (प्रतिनिधी)** – भारतीय जनता पक्षाच्यावतीने साजरा करावयाच्या संत शिरोमणी रविदास महाराज समरसता संकल्प अभियानच्या मुख्य संयोजकपदी अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रा. मनोहर पवार यांची निवड करण्यात आली आहे.

या समितीमध्ये सागर डोंगरजकर, शिवा बेळीकर व शिवराज हांडे यांची सहसंयोजक म्हणून निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी आपल्या निवड पत्रामध्ये पक्षाच्या केंद्रीय समितीकडून आलेल्या आराखड्याप्रमाणे अभियान राबवण्याच्या सूचना केली आहेत. या निवडीमुळे अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# युनिव्हर्सल स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)**– युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूल, कामठा (खु.) येथे आषाढी एकादशीचा पवित्र उत्सव भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृती, परंपरा आणि आध्यात्मिक मूल्यांची जपणूक करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात इयत्ता नर्सरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमादरम्यान अनेक विद्यार्थी श्री विठ्ठल, रुक्मिणी तसेच वारकरी वेशभूषेत सहभागी झाले. टाळ-मृदंगाच्या गजरात, अभंग गायन आणि विठ्ठल विठ्ठल विठ्ठला हरि ॐ विठ्ठला या भक्तिगीतांनी संपूर्ण शाळा परिसर भक्तिरसाने भारावून गेला. विद्यार्थ्यांनी पंढरपूरच्या वारीचा अनुभव साकारत उपस्थितांची मने जिंकली.




या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, संत परंपरा, भक्तीभाव, एकता, शिस्त आणि चांगल्या संस्कारांचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजावून सांगण्यात आले. पारंपरिक सण-उत्सवांमधून मुलांमध्ये सांस्कृतिक मूल्यांची रुजवण करण्याचा शाळेचा सातत्यपूर्ण प्रयत्न यावेळीही दिसून आला. ज्ञान, संस्कार आणि संस्कृतीचा सुंदर संगम हीच युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूलची ओळख असल्याचे मुख्याध्यापिकेंनी सांगितले.

या उत्सवामुळे विद्यार्थ्यांसाठी आषाढी एकादशीचा दिवस संस्मरणीय ठरला.

# आषाढी एकादशीनिमित्त जुना कौठा येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भाविकांची गर्दी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – आषाढी एकादशी निमित्ताने रवीनगर-जुना कौठा येथील विठ्ठल-रूक्मिणी मंदिर येथे भाविक-भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. यावेळी विनोद काकडे यांच्या हस्ते अभिषेक, महापूजा करून आरती करण्यात आली. नंतर दिंडी उत्सव व महाप्रसाद, भक्ती संगीतासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रविनगर-जुना कौठा येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिरात २५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्ताने सकाळी ६ वाजता विनोद धोंडिबाराव काकडे यांच्या हस्ते महाअभिषेक, विधीवत पूजन आरती, तर ७ वाजता दिंडी उत्सव व पालखी सोहळ्याला जुना कौठा येथे सुरूवात करण्यात आली.

यावेळी वृंदावन कॉलनी, बसवेश्वर नगर



मार्ग पुन्हा मंदिरात आल्यानंतर सकाळी माजी जि. प. सदस्य गंगाप्रसाद काकडे यांच्या हस्ते आषाढी एकादशी निमित्ताने दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना फराळाचे तर भाजपा नगरसेविका प्रतिनिधी राजू पाटील काळे व नगरसेवक प्रतिनिधी सतीश अमृतवार यांच्यावतीने फळांचे वाटप करण्यात आले. तर भाविक-भक्तांसाठी विजय बंदमवार व संचाचा भक्ती गीत गायनाच्या कार्यक्रमाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी महापौर कविता मुळे, नगरसेविका सुलोचना काकडे, सौ. अनुराधा काळे, नगरसेवक अभिषेक सौदे, सामाजिक कार्यकर्ते गणेश काकडे यांची उपस्थिती होती. सकाळपासूनच भक्तांनी दर्शनासाठी मंदिर परिसरात गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सचिव संजय पांडे, भारत काकडे, वनरक्षक निवृत्ती काकडे, भागवत बारसे, एकनाथ गोरे, संतोष लाड, मनीष पोलस्वार, कैलाश काळे, सदानंद मोरे, पल्ले, शिवानंद पळसकर यांच्यासह मित्र परिवाराने परिश्रम घेतले. आषाढी एकादशीनिमित्त सकाळपासून मंदीर परिसरात महाप्रसाद दुकानासह विविध साहित्य विक्री दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली होती.

# एसजीजीएस संस्थेत आकाशवाणी परभणीच्या 'युवा कट्टा' कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील एसजीजीएस महाविद्यालयात आयोजित आकाशवाणी परभणीच्या युवा कट्टा कार्यक्रमाला युवकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

भारत लोकसेवा प्रसारक आकाशवाणी, परभणी आणि श्री गुरु गोबिंदसिंघजी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, विष्णुपुरीच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांच्या प्रेरणा व प्रोत्साहनातून महाविद्यालयाच्या सभागृहात 'युवा कट्टा' या विशेष कार्यक्रमाचे अत्यंत उत्साहपूर्ण आणि चैतन्यमय वातावरणात आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी आकाशवाणी परभणीचे कार्यक्रम अधिकारी सदानंद कामडी प्रमुख उपस्थित म्हणून लाभले. तसेच सौ. सुमेधा कुलकर्णी, सौ. सुषमा कुलकर्णी आणि डॉ. सुहास पाठक हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी



नीट पेपर लीक प्रकरण, पर्यावरण संवर्धन व जीवनदान, विद्यापीठातील शिक्षणाचे अनुभव, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शिक्षणातील बदल, युवकांमधील व्यसनाधीनता, बालविवाह व हुंडा प्रथा, कृषी धोरण तसेच विविध चालू घडामोडी यांसारख्या महत्त्वपूर्ण आणि समकालीन विषयांवर आपली परखड मते व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या विचारांमुळे कार्यक्रमाला वैचारिक उंची प्राप्त झाली.

यावेळी काही होतकरू विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सुंदर चारोळ्या आणि कविता सादर करून उपस्थितांची विशेष दाद मिळवली. या संपूर्ण संवादाचे ध्वनिमुद्रण आकाशवाणी, परभणी केंद्रातर्फे करण्यात आले असून, ते आकाशवाणीवर प्रसारित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. माधव वैद्य यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले.

## जिल्हा परिषदेत उद्या पेन्शन अदालतीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचारी तसेच पुढील सहा महिन्यांत सेवानिवृत्त होणारे शिक्षक व कर्मचारी यांच्या पेन्शनविषयक तक्रारी व प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी मंगळवार, दि. २८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या पेन्शन अदालतीमध्ये प्रलंबित पेन्शन प्रकरणांचा सविस्तर आढावा घेऊन शक्यतो त्याच ठिकाणी तत्काळ निपटारा करण्यात येणार आहे. जि. प. चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) राजकुमार मुक्कावार यांनी या पेन्शन अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# जेटेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त वृत्तपत्र विक्रेत्यांना छत्री वाटप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सामाजिक कार्यकर्ते तथा सेवानिवृत्त भूमि अभिलेख उपअधीक्षक के. ना. जेटेवाड यांनी वाढदिवसानिमित्ताने सामाजिक बांधिलकी जोपासत वृत्तपत्र विक्रेत्यांना छत्रीचे वाटप केले.

यावेळी पत्रकार व वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आषाढी एकादशीच्या निमित्ताने वृत्तपत्र विक्रेत्यांना फराळाचे वाटप करण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी २५ जुलै रोजी सामाजिक बांधिलकी जोपासत के.ना. जेटेवाड यांनी यांनी वृत्तपत्र विक्रेत्यांना वाढदिवसाच्या निमित्ताने पावसाळ्यातील पावसापासून बचाव करण्यासाठी छत्र्यांचे वाटप केले. यापूर्वीही विविध उपक्रम राबविले.

वाढदिवसानिमित्ताने नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष रमेश ठाकूर व कोषाध्यक्ष सारंग नेरलकर, डि. गा. पाटील, तिरूपती पाटील घोगरे व वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य सतीश कदम, बालाजी सुताडे, दिलीप ठाकूर, महिला वितरक वंदना लोणे, राजू चव्हाण, अमोल नांदेडकर, तातेराव वाघमारे, गणेश डोळस यांच्यासह वृत्तपत्र विक्रेता बांधव यांनी सत्कार केला.

# पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांना पीपल्स कॉलेजमध्ये अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)** –हैदराबाद मुक्ती संग्रामातील अग्रणी, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांना त्यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी पीपल्स कॉलेजमध्ये अभिवादन करण्यात आले.

कॉलेज परिसरात आयोजित अभिवादन सभेला नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव प्रा. श्यामल पत्की, सहसचिव अ‍ॅड. प्रदीप नागापूरकर, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, उपप्राचार्य प्रा. डॉ. विशाल पतंगे, कार्यकारिणी सदस्य प्रा. विलास वडजे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी गोविंदभाई श्रॉफ यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानासह मराठवाड्यात शिक्षणाचा प्रसार, मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी सामाजिक जागृती आणि त्यांनी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अमोल काळे यांनी केले. कार्यक्रमास, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बरबडा येथे आषाढी एकादशीनिमित्त दिंडी व पालखी सोहळा उत्साहात

**बरबडा (प्रतिनिधी)** –नायगाव तालुक्यातील बरबडा येथील जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीचे औचित्य साधून भव्य दिंडीचे व पालखीचे आयोजन करण्यात आले होते.

आषाढी एकादशी निमित्त काढण्यात आलेल्या दिंडीत बरबडा येथील जवाहरला नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी वारकरी गणवेशात ज्ञानोबा माऊली तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठलाचा अखंड नामघोष करीत गावातील मुख्य रस्त्याने टाळ, मृदंग, विना घेऊन



दिंडी काढण्यात आली. या दिंडीतील विठ्ठल-रुक्मिणीच्या हुबेहूब देखाव्याने बरबडावासीयांचे लक्ष वेधूने घेतले.

या धार्मिक सोहळ्यात विद्यालयाचे मुख्याध्यापक सुदर्शनराव धर्माधिकारी, उपमुख्याध्यापक जी. पी. बडूरे, एस. एन. फड, वसंत शिंदे, एन. टी.तिप्पलवाड, एम. आय. कंडापले, प्रा. तुकाराम कल्याण, एस. पी. पचलिंग यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावातील महिला-पुरुषांनीही मिरवणुकीमध्ये सहभाग नोंदवला. आषाढीनिमित्त काढण्यात आलेल्या या दिंडीमुळे बरबडा गावात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

# साईप्रसाद परिवाराने स्वीकारली अनाथ मुलीच्या कन्यादानाची जबाबदारी

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील साईप्रसाद परिवाराच्या पुढाकाराने शिरड, ता. हदगाव येथील अनाथ कन्या संजीवनीचा विवाह थाटात संपन्न झाला. शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी पार पडलेल्या या विवाहासाठी कन्यादानाची जबाबदारी साईप्रसाद परिवाराने स्वीकारली.

देश- विदेशातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून गेल्या अनेक वर्षांपासून साईप्रसाद परिवार निस्वार्थ भावनेने सामाजिक कार्य करत आहे. शासकीय रुग्णालय, विष्णुपुरी नांदेड येथे रुग्ण व नातेवाईकांसाठी दररोज दोन वेळा अन्नदान आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची अखंडित सेवा ही त्यांची महत्त्वाची सेवा आहे.

याशिवाय जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त, अनाथ व गरजू कुटुंबांसाठी दरवर्षी सामूहिक विवाह मेळावे आयोजित करून आतापर्यंत प्रसिद्धीपासून दूर राहून १०३ विवाहांमध्ये कन्यादान, अन्नदान व संसारोपयोगी साहित्य देऊन मदत केली आहे.



गेल्या वर्षापासून त्यांनी अनाथ मुलींचा विवाह लावून देण्याचा संकल्प केला आहे.

शिरड येथील अनाथ संजीवनीचा विवाह जुळल्यानंतर कन्यादानाची जबाबदारी कोण स्वीकारणार हा प्रश्न निर्माण झाला होता. ही माहिती साईप्रसाद परिवाराला मिळताच त्यांनी तातडीने मदतीचा निर्णय घेतला. साईप्रसाद परिवाराच्या वतीने जमा झालेल्या निधीतून हदगाव-निवघा बाजार येथील दुकानदारांनीही या निस्वार्थ कार्यात सहभाग घेतला. त्यांनी नफा-न तोटा तत्त्वावर दर्जे दार वस्तू दिल्या. त्यात आरमारी, पलंग, गादी, रॅक, मिक्सरसह इतर संसारोपयोगी साहित्याचा समावेश होता. तसेच ३०० नातेवाईकांसाठी जेवणाचे साहित्य व आचारी यांची व्यवस्था करून आवश्यक सर्व मदत विवाहाच्या चार दिवस आधी देण्यात आली.

शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी संजीवनीचा विवाह मोठ्या थाटात पार पडला. यावेळी दोन्ही परिवार, नातेवाईक आणि गावकरी उपस्थित होते. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य संभाजी लांडगे, सामाजिक कार्यकर्ते निवृत्तीराव वानखेडे, गजानन अनंतवार, सविता निमडगे, रामेश्वर बोरकर, बंडू माटाळकर, प्रभाकर दहिभाते, महेश बोरकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# चंदेरी

## अभिनेते अन्नू कपूर यांची विशेष मुलाखत

# गल्लीबोळात नवे कंटेंट क्रिएटर्स, प्रेक्षकांकडे आता भरपूर पर्याय...



**अभिनेते अन्नू कपूर सध्या त्यांच्या आगामी 'उत्तर दा पुत्तर' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. या निमित्ताने त्यांनी दिलेल्या विशेष मुलाखतीत चित्रपटाची निवड, आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीतील अनुभव, दर्जेदार आशयाचे महत्त्व आणि आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन यावर मनमोकळ्या गप्पा मारल्या. साडेचार दशकांहून अधिक काळ चित्रपटसृष्टीत सक्रिय असलेले अन्नू कपूर हे 'अंताक्षरी' या लोकप्रिय कार्यक्रमाचे सूत्रसंचालक, तसेच 'विकी डोनर' आणि 'ड्रीम गर्ल'मधील त्यांच्या संस्मरणीय भूमिकांसाठी ओळखले जातात. आपल्या प्रवासाबद्दल बोलताना ते म्हणाले, की 'या क्षेत्राने मला खूप काही दिले. माझ्या नशिबात जितके होते, तितके मला मिळाले, याचाच मला आनंद आहे.' २०१२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'विकी डोनर' चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता.**

### गंभीर आशयाच्या चित्रपटांनाच अधिक यश

विनोदी चित्रपट नेहमीच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरतात का, असा प्रश्न विचारला असता अन्नू कपूर यांनी वेगळेच मत मांडले. ते म्हणाले, की 'असे अजिबात नाही. बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई करणाऱ्या आणि आशयप्रधान ठरलेल्या चित्रपटांपैकी जवळपास ८० टक्के चित्रपट हे गंभीर विषयांवरील आहेत. ऑस्कर पुरस्कारांचा सव्वाशे वर्षांचा इतिहास पाहिला, तर केवळ दोन विनोदी चित्रपटांना 'सर्वोत्कृष्ट चित्रपट' हा पुरस्कार मिळाला आहे. जर केवळ विनोदी चित्रपटांनाच यश मिळत असते, तर फक्त विनोदी चित्रपट बनवणाऱ्या दिग्दर्शकांची नावे सर्वोत्तम दिग्दर्शकांच्या यादीत अग्रस्थानी दिसली असती; मात्र तसे नाही.'

### दिल्लीतील संघर्षाचे दिवस अजूनही आठवतात

नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (NSD)मध्ये शिक्षण घेत असताना अन्नू कपूर यांनी दिल्लीत संघर्षमय दिवस अनुभवले. त्या काळातील एक आठवण सांगताना ते भावूक झाले. ते म्हणाले, की 'आज मुलाखतीसाठी येताना मी रिफ्यूजी मार्केटमधून गेलो आणि माझ्या तरुणपणातील दिवस आठवले. त्या वेळी अनेकदा खाण्याचीही पंचाईत व्हायची. मे-जूनच्या प्रचंड उकाड्यात सलग दोन- तीन दिवस पोटभर अन्न मिळाले नव्हते. एकदा कामाच्या मोबदल्यात ७५ रुपयांचा धनादेश मिळाला. इतकी भूक लागली होती की त्या दिवशी मी तब्बल २३ पोळ्या, दोन बटर टिक्क्या, नत्थू स्वीट्समधील छोले आणि डाळ फ्राय खाल्ले. त्यानंतर होस्टेलपर्यंत पायी चालत गेलो, कारण रिक्षाचे भाडेही उरले नव्हते. होस्टेलवर जाऊन आंघोळ केली आणि अशी झोप लागली की थेट रात्री साडेनऊ वाजता जाग आली', अशी आठवण त्यांनी सांगितली.

### प्रेक्षकांकडे पर्यायांची कमतरता नाही...

'उत्तर दा पुत्तर'मध्ये अन्नू कपूर एका अशा व्यक्तीची भूमिका साकारत आहेत, जो सतत भविष्याची चिंता करत असतो. हा चित्रपट स्वीकारण्यामागचे कारण सांगताना त्यांनी आशयाला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, 'या चित्रपटाचा विषय अतिशय चांगला आहे. चांगला आशय असेल, तर आपल्या चित्रपटसृष्टीतील कोणताही कलाकार त्याला नकार देणार नाही. कारण आता प्रत्येकालाच समजले आहे की प्रेक्षकांकडे मनोरंजनाचे असंख्य पर्याय उपलब्ध आहेत. तुम्ही दर्जेदार आशय दिलात, तरच प्रेक्षक तुमच्याकडे येतील. आज प्रत्येक गल्लीबोळात नवे कंटेंट क्रिएटर्स निर्माण होत आहेत. ही स्पर्धा समाजासाठीही चांगली आहे, कारण त्यामुळे अधिक दर्जेदार आशय प्रेक्षकांसमोर येईल.'

### मृत्यू स्वीकारण्याची शिकवण मिळाली...

भविष्याची किंवा मृत्यूची भीती कधी वाटली नाही का, या प्रश्नावर अन्नू कपूर यांनी गुरू नानक देवांच्या जीवनातील एक प्रसंग सांगितला. ते म्हणाले, की 'मला भीती वाटत नाही, कारण मी सद्गुरू श्री गुरू नानक देवांकडून एक महत्त्वाची शिकवण घेतली आहे. लहानपणी गुरू नानक काही काळ बेपत्ता झाले होते. शोध घेतल्यानंतर ते स्मशानभूमीत सापडले. त्यांना तिथे का बसलात, असे विचारले असता त्यांनी सांगितले की हे मृत्यूचे घर नाही. येथे कोणी मरत नाही, तर लोक मृत्यूनंतर येथे येतात. खरे तर ज्या घराला आपण आपले घर म्हणतो, तिथेच माणूस मृत्यूला सामोरे जातो. म्हणून मी मृत्यूला आयुष्याइतक्याच सहजतेने स्वीकारले आहे. त्यामुळे मला भविष्यातील किंवा मृत्यूची भीती वाटत नाही.

## अभिनेत्री महिमा मकवानाची विशेष मुलाखत

# 'सलमान सरांमुळेच मी चित्रपटांत!; ते कायम माझे मार्गदर्शक राहतील...

**बालकलाकार म्हणून दूरदर्शनवर कारकीर्द सुरू करणारी अभिनेत्री महिमा मकवाना आज टीव्ही, ओटीटी आणि चित्रपट या तिन्ही माध्यमांमध्ये यशस्वीपणे काम करत आहे. सलमान खानच्या 'अंतिम' चित्रपटातून तिने हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. आता ती विक्रांत मॅसीसोबतच्या 'मुसाफिर कॅफे' या वेब मालिकेमुळे चर्चेत आहे. विशेष मुलाखतीत महिमाने आपल्या संघर्षमय प्रवासाविषयी, कुटुंब, प्रेम, सलमान खान आणि नव्या प्रकल्पांबद्दल मनमोकळ्या गप्पा मारल्या.**



### सलमान खानमुळे माझ्या आयुष्याला नवे वळण

'अंतिम'मध्ये नायिका म्हणून निवड झाल्याने आपल्या कारकिर्दीला नवी दिशा मिळाल्याचे महिमा सांगते. ती म्हणाली, की 'माझ्या संपूर्ण प्रवासाचा मला मनापासून अभिमान आहे. मी एवढेच सांगू इच्छिते की, जर मी हे करू शकले, तर कोणतीही व्यक्ती करू शकते. मेहनत करत राहा, हार मानू नका. नशिबात जे असेल ते मिळेल, पण प्रयत्न कधीही थांबवू नयेत.

### प्रेम म्हणजे आयुष्याचा श्वास...

प्रेम आणि नातेसंबंधांविषयी बोलताना महिमाने स्वतःचा दृष्टिकोन स्पष्ट केला. ती म्हणाली, 'माझ्या मते प्रेम हे आयुष्यातील ऑक्सिजनसारखे आहे. मात्र, सध्या माझ्यासाठी स्वतःचा विकास आणि करिअर यांनाच सर्वाधिक प्राधान्य आहे. प्रेम खूप सुंदर भावना आहे, पण प्रत्येकजण आपल्या प्राधान्यानुसार निर्णय घेत असतो. काही लोक आयुष्यात येतात, काही निघून जातात. आज माझ्यासोबत चांगले मित्र आणि माझे कुटुंब आहे, त्यामुळे मी स्वतःला पूर्ण समजते.' महिमा म्हणाली, की 'परिंदा' नावाच्या माझ्या पाळीव कुत्र्याने मला प्रेमाचा खरा अर्थ शिकवला. शाळा आणि महाविद्यालयीन काळात मीही प्रेमात पडले होते. काही नाती यशस्वी होतात, काही नाहीत; पण प्रत्येक नाते आपल्याला अधिक चांगला माणूस बनवून जाते. सध्या मी स्वतःवर प्रेम करायला शिकत आहे.'

### चाळीतून स्वत :च्या घरापर्यंतचा प्रवास...

महिमाच्या वडिलांचे निधन लहानपणीच झाले. त्यानंतर तिच्या आईने एकटीने महिमा आणि तिच्या भावाचा सांभाळ केला. त्या दिवसांची आठवण सांगताना महिमा म्हणाली, की माझा मोठा भाऊ तेव्हा नऊ वर्षांचा होता, तर मी अवघी सहा महिन्यांची होते. आईने आम्हा दोघांना एकटीने वाढवले. आम्ही खूप कठीण दिवस पाहिले. चाळीत राहत असल्यामुळे स्वतःच्या घराचे स्वप्न कायम डोळ्यांसमोर होते. आईने मला शिकवले की हार मानणे सर्वांत सोपे असते; पण संकटांशी खंबीरपणे लढणे हेच खरे धैर्य आहे.' महिमा म्हणाली, की '२०१३ मध्ये 'सपने सुहाने लड़कपन के' ही मालिका करत असताना मी माझे पहिले घर घेतले. आयुष्यभर भाड्याच्या घरात किंवा चाळीत राहिल्यानंतर स्वतःचे घर मिळणे म्हणजे केवळ मालमत्ता नव्हे, तर एक स्वप्न पूर्ण झाल्याची भावना असते. त्या दिवशी आमच्या मेहनतीचे चीज झाल्याचा खरा आनंद मिळाला.'

### आईला म्हणाले, आता तुला काम करण्याची गरज नाही...

आईच्या योगदानाबद्दल बोलताना महिमा भावूक झाली. ती म्हणाली, की 'आई-वडिलांचे ऋण कधीही फेडता येत नाही. त्यांनी आपल्याला या जगात आणले, यापेक्षा मोठी भेट कोणतीच नाही. मी कमवायला लागल्यानंतर आईला सांगितले की आता तुला काम करण्याची गरज नाही. आज माझा सर्वांत मोठा प्रयत्न म्हणजे तिला आरामदायी आणि आनंदी आयुष्य देणे. लोकांना वाटते मी तिला महागडी गाडी, भेटवस्तू किंवा परदेश प्रवास दिला असेल. पण तिला त्या गोष्टींची गरज नाही. ती जशी आहे, जिथे आहे, तिथे आनंदी आहे. ती कायम सुखी राहावी, एवढीच माझी इच्छा आहे.'

### 'सलमान सर कायम माझे मार्गदर्शक राहतील'



सलमान खानसोबत 'अंतिम'मध्ये काम करणे हा आपल्या कारकिर्दीतील सर्वांत मोठा टर्निंग पॉइंट असल्याचे महिमा सांगते. ती म्हणाली, की 'अंतिम' माझ्यासाठी खूप मोठा टर्निंग पॉइंट ठरला. टीव्हीवरून चित्रपटांपर्यंतचा माझा प्रवास या चित्रपटामुळेच शक्य झाला. सलमान सरांनी माझ्यातील क्षमता ओळखली नसती आणि मला संधी दिली नसती, तर कदाचित आज मी चित्रपटांत काम करत नसते. 'अंतिम'ने माझ्या कारकिर्दीची दिशा बदलली. त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला आणि पहिला चित्रपट दिला. त्यानंतरचा प्रवास माझा स्वतःचा आहे. मात्र, आयुष्यात कधी कठीण प्रसंग आला, तर मी त्यांच्याकडे नक्कीच जाऊ शकते, हा विश्वास कायम आहे. ते नेहमीच माझ्यासाठी मार्गदर्शक राहतील.'

### विक्रांत मॅसीसोबत आता नायिका म्हणून...

'मुसाफिर कॅफे'मध्ये विक्रांत मॅसीसोबत मुख्य भूमिकेत दिसणार असल्याबद्दल महिमा विशेष उत्सुक आहे. ती म्हणाली, की 'सुमारे पंधरा वर्षांपूर्वी माझ्या कारकिर्दीच्या सुरुवातीला मी विक्रांतसोबत बालकलाकार म्हणून काम केले होते. 'बालिका वधू'च्या काळात त्यांची पहिल्यांदा भेट झाली. त्यांच्यासोबत फोटो काढण्यासाठी मी स्वतः गेले होते. आज अनेक वर्षांनंतर आम्ही एकमेकांसमोर प्रमुख भूमिकेत संपूर्ण मालिका करत आहोत, ही खूप खास भावना आहे.' महिमा म्हणाली, की 'विक्रांत अतिशय उत्तम अभिनेता आणि त्याहूनही चांगला माणूस आहे. त्याच्याकडून मी सर्वांत महत्त्वाची गोष्ट शिकले, ती म्हणजे शिस्त. आपल्या कामाबद्दलची त्याची निष्ठा आणि गंभीरता प्रेरणादायी आहे. इतके यश मिळूनही त्याच्यातील नम्रता आजही कायम आहे. 'मुसाफिर कॅफे'मध्ये मी एका कॅफेच्या मालकीणीची आणि रोमँटिक स्वभावाच्या मुलीची भूमिका साकारत आहे. अशी भूमिका करण्याची माझी इच्छा होती आणि ती पूर्ण झाल्याचा मला आनंद आहे.

# 'रामायण'चा क्लायमॅक्स अद्याप चित्रित नाही

**दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या महत्त्वाकांक्षी 'रामायण' चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. तब्बल ४,००० कोटी रुपयांच्या या चित्रपटाचा पहिला भाग दिवाळी २०२६ मध्ये प्रदर्शित होणार असून, त्याआधी निर्माते ट्रेलर प्रदर्शित करण्याच्या तयारीत आहेत. दरम्यान, चित्रपटाच्या क्लायमॅक्सबाबत अभिनेता रणबीर कपूरने मोठा खुलासा केला आहे.**

'रामायण'मध्ये प्रभू श्रीरामांची भूमिका साकारणाऱ्या रणबीर कपूरने एका कार्यक्रमात सांगितले की, चित्रपटातील सर्वात महत्त्वाचा क्लायमॅक्स अद्याप चित्रित झालेला नाही. त्यामुळे त्याला रावणाची भूमिका साकारणाऱ्या अभिनेता यशसोबत अद्याप एकत्र काम करण्याची संधी मिळालेली नाही. रणबीर म्हणाला, की 'चित्रपटाच्या शेवटी प्रभू श्रीराम आणि रावण समोरासमोर येतील. कदाचित त्याआधीही काही प्रसंगांमध्ये त्यांची भेट होईल. मात्र, त्या भागाचे चित्रीकरण अद्याप झालेले नाही. त्यामुळे आम्ही दोघांनी एकत्र शूटिंग केलेले नाही.'

### यश या भूमिकेसाठी सर्वार्थाने योग्य...

या वेळी रणबीरने यशच्या अभिनयाचे आणि व्यक्तिमत्त्वाचेही कौतुक केले. तो म्हणाला, की मी यशला काही वर्षांपासून ओळखतो आणि त्याच्या कामाचा मोठा चाहता आहे. रावणासारखी भूमिका साकारण्यासाठी त्याच्यासारखे व्यक्तिमत्त्व, स्टारडम आणि दृष्टिकोन असलेला अभिनेता आवश्यक होता. त्याने ही भूमिका अतिशय दमदार शैली, प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि प्रामाणिकपणे साकारली आहे. त्यामुळे रावणाचे पात्र जिवंत झाले आहे. अनेक वर्षांपासून रावणाला एका ठरावीक साच्यात दाखवले जात होते, पण या चित्रपटात तो वेगळ्या रूपात दिसेल.



### रणबीरचे यशबद्दल कौतुक; यशनेही दिली दाद

या कार्यक्रमात यशनेही रणबीर कपूरच्या अभिनयाचे भरभरून कौतुक केले. यश म्हणाला, की 'जगात कोणीही सहजपणे 'मी प्रभू श्रीरामांची भूमिका साकारू शकतो' असे म्हणू शकत नाही. रणबीरने ही जबाबदारी स्वीकारली, यावरूनच त्याची क्षमता दिसून येते. तो उत्कृष्ट अभिनेता आहे. प्रभू श्रीरामांसारखे पात्र साकारणे सोपे नाही आणि त्याने केलेल्या मेहनतीबद्दल मला त्याच्याबद्दल खूप आदर आहे.' 'रामायण' हा चित्रपट दोन भागांत प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे अंतिम युद्ध आणि क्लायमॅक्स दुसऱ्या भागात दाखवला जाणार असून, त्याच्या चित्रीकरणासाठी निर्मात्यांकडे अजून पुरेसा वेळ आहे. सध्या प्रेक्षकांचे लक्ष दिवाळी २०२६ मध्ये प्रदर्शित होणाऱ्या पहिल्या भागाकडे लागले आहे. या चित्रपटात रणबीर कपूर प्रभू श्रीराम, यश रावण, साई पल्लवी सीता, सनी देओल हनुमान, तर रवी दुबे लक्ष्मण यांच्या भूमिकेत दिसणार आहेत.

# 'जन नायकन'नंतर बॉबी देओल पुन्हा चर्चेत; 66 कोटींची संपत्ती, कोट्यवधींचे मानधन

**'जन नायकन' या चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर अभिनेता बॉबी देओल पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. थलपती विजयच्या या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारलेल्या बॉबीच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. 'ॲनिमल' चित्रपटाच्या यशानंतर त्याच्या कारकिर्दीला नवे वळण मिळाले असून, त्याने आपल्या मानधनातही मोठी वाढ केल्याचे वृत्त आहे. विविध माध्यमांतील अहवालांनुसार, बॉबी देओलची एकूण संपत्ती सुमारे ६६ कोटी रुपये आहे.**



चित्रपटांमधील मानधन, जाहिराती तसेच देओल कुटुंबाच्या विविध व्यावसायिक उपक्रमांमधील सहभागातून त्याला उत्पन्न मिळते. 'ॲनिमल' चित्रपटासाठी बॉबीने कथितरित्या ४ ते ५ कोटी रुपये मानधन घेतले होते. या चित्रपटाच्या व्यावसायिक यशानंतर त्याच्या लोकप्रियतेत लक्षणीय वाढ झाली. 'जन नायकन'मध्ये खलनायकाची भूमिका साकारण्यासाठी बॉबी देओलला ५ ते १० कोटी रुपये मानधन मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, चित्रपटाच्या निर्मात्यांनी या मानधनाबाबत अधिकृत पुष्टी केलेली नाही.



### मुंबईत आलिशान घर

बॉबी देओलकडे मुंबईतील विले पार्ले येथे सुमारे ६ कोटी रुपये किमतीचे आलिशान घर आहे. आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या या घराचे फोटो आणि व्हिडिओ तो सोशल मीडियावर अनेकदा शेअर करत असतो. अभिनयासोबतच बॉबी देओलला देओल कुटुंबाच्या व्यावसायिक उपक्रमांमधूनही उत्पन्न मिळते. प्रसिद्ध 'गरम धरम' हायवे रेस्टॉरंट साखळी तसेच आदरातिथ्य (हॉस्पिटॅलिटी) क्षेत्रातील इतर व्यवसायांमध्ये कुटुंबाची गुंतवणूक असून, त्यातूनही त्याला आर्थिक लाभ होतो.




### थलपती विजयचे मानधनही चर्चेत

'जन नायकन'मधील बॉबी देओलच्या मानधनाबरोबरच मुख्य अभिनेता थलपती विजयच्या मानधनाचीही मोठी चर्चा आहे. वृत्तांनुसार, विजयला या चित्रपटासाठी २२० ते २७५ कोटी रुपये मानधन मिळाले आहे. 'जन नायकन'ने बॉक्स ऑफिसवरही दमदार सुरुवात केली आहे. चित्रपटाने भारतात पहिल्याच दिवशी ४१ कोटी रुपयांची (नेट) कमाई केली. देशभरातील १३,०६७ शोमध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने देशांतर्गत ४८.२७ कोटी रुपये (ग्रॉस), तर परदेशात ३० कोटी रुपये कमावले. त्यामुळे पहिल्या दिवसाचे जागतिक एकूण (ग्रॉस) कलेक्शन ७८.२७ कोटी रुपये इतके झाले. दुसऱ्या दिवशी चित्रपटाने सुमारे २१ कोटी रुपयांची कमाई केल्याचेही वृत्त आहे.

# मुसळधार पावसाने सातशे कुटुंब बेघर; पूरस्थितीने अनेकांचे स्थलांतर



**नाशिक(प्रतिनिधी)**–नाशिक जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसाने जिल्हातील जवळपास सर्वच धरणे तुडुंब भरली आहे. ज्यामुळे अनेक धरणांतून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. पावसामुळे गोदावरी नदीच्या पाणीपातळीत देखील वाढ झाली आहे. पाणीपातळीत वाढ झाल्याने निफाड तालुक्यातील चांदोरी आणि सायखेड्यात पूरस्थिती निर्माण होऊन शेकडो कुटुंबीयांवर बेघर होण्याची वेळ आलीय. तर चांदोरीत तब्बल ४०० कुटुंबांचे तर सायखेड्यात २५० कुटुंबांचे स्थलांतर करण्यात आले आहे. चांदोरीत या पुरामुळे तब्बल १०० तर सायखेड्यात १२५ दुकानांमधील मालाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदमचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार सोबतच ग्रामीणच्या अपर पोलिस अधीक्षक विमला एम. यांनी पूरग्रस्त भागाला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी पूरग्रस्त भागात काही ठिकाणी पाणी साचल्यामुळे वाहनांची वाहतूक शक्य नसल्याने सीईओ पवार यांनी थेट ट्रॅक्टरवरून पूरग्रस्त भागात जाऊन नागरिकांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष माहिती घेतली. यानंतर सर्व विभाग प्रमुख, आपत्ती व्यवस्थापन समिती तसेच संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत पूरग्रस्त नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी ग्रामपंचायतीमार्फत सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आलेल्या कुटुंबांची भेट घेऊन त्यांच्या राहण्याच्या व इतर आवश्यक सुविधांची पाहणी करण्यात आली.

नाशिकमधून जायकवाडी धरणाकडे नेमके किती पाणी सोडण्यात आले? जून महिन्यात जायकवाडीतील पाणीसाठा किती होता? आणि या विसर्गावर नियंत्रण नेमके कोणाचे आहे? अशा प्रश्नांची सरबत्ती करत आमदार देवयानी फरांदे यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. नाशिककरांच्या हक्काच्या पाण्याबाबत माहिती लपवली जात असल्याचा आरोप करत, यापुढे कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यातून तब्बल ९४ हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू होता. हे पाणी जायकवाडी धरणात प्रत्यक्षात किती पोहोचले, याची अधिकृत आकडेवारी मागितल्यानंतर प्रशासनाकडे त्याची माहितीच उपलब्ध नसल्याचे समोर आले. यावर संतप्त होत आमदार देवयानी फरांदे यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. नाशिकमधून सोडल्या जाणाऱ्या पाण्याचा हिशेबच नसणे ही गंभीर बाब असून, अधिकारी आकडेवारी लपवत असल्याचा आरोप त्यांनी केला. जायकवाडी धरणात सध्या अवघा ३१ टक्के पाणीसाठा आहे. त्यातील २४ टक्के मृतसाठा वजा केल्यानंतर उपयुक्त पाणीसाठा अत्यल्प राहतो. अशा परिस्थितीत मृतसाठ्याचा नियमबाह्य वापर झाला आहे का, याची चौकशी करण्याची मागणी फरांदे यांनी केली. नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचीही त्यांनी मागणी केली.

# पैसे नाही म्हणून शस्त्रक्रिया थांबणार नाही –मुख्यमंत्री फडणवीस

## गंभीर आजारांवरील उपचारांसाठी हजारो रुग्णांनी घेतला ‘महाआरोग्य शिबिरा’चा लाभ

**नागपूर(प्रतिनिधी)**–आजार कितीही गंभीर आणि मोठा असला तरी केवळ पैसे नाही म्हणून गरिबांचे उपचार थांबू नये, यासाठी राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध केला आहे. येथे आयोजित महाआरोग्य शिबिर हे गरीब रुग्णांसाठी एक वरदान असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे धनवटे नॅशनल कॉलेजच्या प्रांगणात आयोजित महाआरोग्य शिबिरात आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार अजित गोपछडे, आमदार सर्वश्री. प्रवीण दटके, संजय भेंडे, मोहन मते,राजीव पोतदार, महापौर नीता ठाकरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

समाजातील शेवटच्या घटकाला आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्या हाच या शिबिराचा उद्देश असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, सर्वांना आरोग्य सुविधा मिळाव्या यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय राज्य शासनाने घेतले. रुग्णालयांची संख्या वाढवली. राज्य सरकारच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेत यापूर्वी जे गंभीर आजार नव्हते, ते समाविष्ट केले. गेल्या दीड वर्षात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षातर्फे ५७ हजार रुग्णांना ४५२ कोटी रुपये उपचारांसाठी उपलब्ध करून दिले. सर्व धर्मादाय रुग्णालयातील खाटा गरिब रुग्णांसाठी राखीव असल्या पाहिजे, यासाठी डिजिटल पद्धती निर्माण केली.जवळपास १० आजार असे आहेत की जे योजनेच्या ५ लाख रुपयांच्या मर्यादेत बसू शकत नाही, त्यामुळे त्यासाठी ९ लाखांपर्यंत, तर काही आजारांच्या बाबतीत ३५ लाख रुपयांपर्यंत मदत करण्याचे शासनाचे धोरण असल्याची माहिती मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिली.

## सारनाथ प्राचीन बौद्ध स्थळाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)** दक्षिण कोरियातील बुसान येथे सुरू असलेल्या ‘जागतिक वारसा समिती’च्या ४८ व्या बैठकीत, भारताने २०२५–२६ या वर्षाकरिता वारसा यादीत समावेशसाठी अधिकृतपणे नामांकन केलेल्या ’सारनाथ येथील प्राचीन बौद्ध स्थळाचा’ युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून वारसास्थळ म्हणून मान्यता मिळालेले हे भारतातील ४५ वे ठिकाण ठरले आहे.

# गेल्या १२ वर्षांत आठ घटना दुरुस्त्या

## सरकारची संसदेत माहिती

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– गेल्या बारा वर्षांत भारताच्या राज्यघटनेत आठ वेळा दुरुस्ती करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्रीय विधी आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात ही दिली.

अधिनियमित करण्यात आलेल्या संबंधित घटनादुरुस्ती विधेयकांचा तपशील पुढीलप्रमाणे : १. भारताच्या राज्यघटनेची (९९ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१४ (सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांतील न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी विद्यमान कोलेजियम प्रणालीच्या जागी राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग स्थापन करण्यासंबंधी. २. भारताच्या राज्यघटनेची (१०० वी दुरुस्ती) अधिनियम, २०१५ (भारत आणि बांगलादेश यांच्यातील भू–सीमा कराराशी संबंधित. ३. भारताच्या राज्यघटनेची (१०१ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१६ (देशातील वस्तू आणि सेवा कर (जीएसटी ) शी संबंधित). ४. भारताच्या राज्यघटनेची (१०२ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१८ (राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा प्रदान करण्यास संबंधित). ५. भारताच्या राज्यघटनेची (१०३ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१९ (सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षणाशी संबंधित). ६. भारताच्या राज्यघटनेची (१०४ वी दुरुस्ती) अधिनियम, २०१९ (लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी जागांचे आरक्षण आणखी दहा वर्षांसाठी, म्हणजेच २५ जानेवारी, २०३० पर्यंत वाढविण्यास संबंधित). ७. भारताच्या राज्यघटनेची (१०५ वी दुरुस्ती) अधिनियम, २०२१ (राज्यघटनेच्या अनुच्छेद ३४२ मध्ये दुरुस्ती तसेच त्यानुषंगाने राज्यघटनेच्या अनुच्छेद ३३८इ आणि ३६६ मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्त्यांशी संबंधित). ८. भारतीय राज्यघटनेची (१०६ वी दुरुस्ती) अधिनियम, २०२३ (लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी जागांचे आरक्षण करण्यास संबंधित).


## Change In Name

MY OLD NAME IS MAHAMAD MD SALAUDDIN MD KHAMRODDIN WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME MOHAMMED SALAUDDIN MOHAMMED KHAMRODDIN HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME.

ADDRESS: HASHMI NAGAR, KINWAT ROAD, BHOKAR, TQ. BHOKAR, DIST. NANDED - 431801

## Change In Name

My Old Name is **Pandid Jamuna Vitthalrao** NOW I AM CHANGING as a New Name **Asha Madanrao Waghmare.** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

Address - H.No. 1-15-599, Rupali Nivas, Vishnunagar, Nanded 431602
Mo.No. 9422174462

## Change In Name

MY OLD NAME IS **"Shaikh Saleem Shaikh Azim"** WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME " Shaikh Saleem Shaikh Azeemulla" HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER NEW NAME.PLEASE CONSIDER THE SAME.

**Adress-** Mominpura Tq. Kinwat Dist Nanded (MH) 431804


# राष्ट्रपती, पंतप्रधानांसह मान्यवरांकडून कारगिल विजय दिनानिमित्त वीर योद्ध्यांना श्रद्धांजली



**नवी दिल्ली(वृत्तसंस्था)**–कारगिल विजय दिनानिमित्त कृतज्ञ राष्ट्र आज वीर जवानांना अभिवादन करत आहे. यावर्षीचा मुख्य कार्यक्रम नवी दिल्लीऐवजी लडाखमधील द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकावर आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शाह आणि जम्मू–काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी आज सकाळी आपल्या एक्स पोस्टद्वारे भारतीय सशस्त्र दलांच्या शूर सैनिकांना श्रद्धांजली अर्पण केली. या दिवसाच्या पूर्वसंध्येला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शत्रूचे छक्के सोडवणाऱ्या भारतीय सैन्याच्या शूर जवानांना द्रास येथे जाऊन श्रद्धांजली वाहिली.

राष्ट्रपती भवनाच्या अधिकृत एक्स हँडलवर राष्ट्रपती मुर्मू यांनी आज सकाळी लिहिले, कारगिल विजय दिनानिमित्त मातृभूमीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर योद्ध्यांना मी विनम्र श्रद्धांजली अर्पण करते. त्यांचे अद्वितीय शौर्य, अढळ निर्धार आणि अनन्य राष्ट्रभक्ती ही आपल्या सैन्याच्या गौरवशाली परंपरेची अप्रतिम उदाहरणे आहेत. देश सदैव त्यांचा ऋणी राहील. आपल्या त्या पराक्रमी वीरांची शौर्यगाथा भावी पिढ्यांना राष्ट्रसेवा आणि कर्तव्यनिष्ठेच्या मार्गावर सतत प्रेरणा देत राहील.

उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी लिहिले, कारगिल विजय दिनानिमित्त देश भारतीय सशस्त्र दलांच्या त्या शूर सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करतो, ज्यांच्या असामान्य धैर्य, अटळ निर्धार आणि सर्वोच्च बलिदानामुळे कारगिल युद्धात भारताला ऐतिहासिक विजय मिळाला आणि आपल्या देशाची सार्वभौमता व प्रादेशिक अखंडता अबाधित राहिली. हा विजय भारताच्या लष्करी सामर्थ्याचा, राष्ट्रीय एकतेचा आणि मातृभूमीच्या प्रत्येक इंचाचे रक्षण करण्याच्या अढळ संकल्पाचा पुरावा आहे. देश आपल्या शूर सैनिकांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा सदैव ऋणी राहील. जय हिंद.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिले, कारगिल विजय दिनानिमित्त संपूर्ण देश भारताच्या सुरक्षेसाठी शूर सैनिकांनी दाखवलेल्या असामान्य धैर्य आणि समर्पणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. अत्यंत कठीण परिस्थितीतही त्यांचे अदम्य धैर्य नेहमीच राष्ट्रीय अभिमानाचे स्रोत राहील. त्यांची अटळ देशभक्ती आणि कर्तव्यनिष्ठा भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लिहिले, कारगिल विजय दिन हा भारतीय सैन्याच्या अदम्य शौर्य आणि अद्वितीय पराक्रमाचे प्रतीक आहे. सन १९९९ मध्ये हिमालयातील दुर्गम बर्फाच्छादित शिखरांवर अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आणि उंचावरील शत्रूच्या मोर्चांनाही न जुमानता आपल्या वीर जवानांनी ’ऑपरेशन विजय’च्या माध्यमातून शत्रूला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. कारगिल विजय दिनानिमित्त देशाची अखंडता अबाधित राखण्यासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या त्या सर्व वीर सपूतांचे स्मरण करून त्यांना विनम्र अभिवादन करतो.

जम्मू–काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी लिहिले, ऑपरेशन विजयदरम्यान भारतमातेची सार्वभौमता आणि सन्मानाचे रक्षण करण्यासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीदांना कारगिल विजय दिनानिमित्त मी विनम्र अभिवादन करतो. आपल्या सशस्त्र दलांचे असामान्य शौर्य भावी पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. शहीद वीरांच्या कुटुंबीयांप्रतीही मी गाढ आदर व्यक्त करतो. त्यांचे निःस्वार्थ समर्पण हे आपल्या सर्वोच्च राष्ट्रीय अभिमानाचे चिरंतन प्रतीक आहे.

विशेष म्हणजे, यावर्षी कारगिल विजय दिनाचा मुख्य कार्यक्रम नवी दिल्लीऐवजी लडाखमधील द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकावर आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह द्रास येथे पोहोचले आणि शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली. हे युद्ध मे १९९९ ते २६ जुलै १९९९ या सुमारे ६० दिवसांच्या कालावधीत लढले गेले.

हिवाळ्याच्या काळात झालेल्या घुसखोरीचा शोध लागल्यानंतर भारतीय स्थलसेनेने ‘ऑपरेशन विजय’ आणि भारतीय वायुसेनेने ‘ऑपरेशन सफेद सागर’ सुरू केले. भारतीय सैनिकांनी दुर्गम पर्वत, उणे तापमान आणि कठीण परिस्थितीचा सामना करत तोलोलिंग, टायगर हिल आणि पॉइंट ४८७५ यांसारखी महत्त्वाची शिखरे पाकिस्तानच्या ताब्यातून पुन्हा हस्तगत केली. भारतीय सैन्याच्या अदम्य शौर्य आणि पराक्रमानंतर २६ जुलै १९९९ रोजी राष्ट्राने गमावलेल्या सर्व चौक्यांवर पुन्हा ताबा मिळवला. या ऐतिहासिक विजयाच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिन साजरा केला जातो.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार प्रवीण रामराव जगडमवार रा. आदर्श कॉलनी, किनवट ता. किनवट, जि. नांदेड यांनी सिद्धेश्वर बालाजी कागणे यांच्या मालकी व ताब्यातील वार्ड क्र. ०५ मधील ग्रामपंचायत मालमत्ता क्र. १६४८/०७ क्षेत्रफळ उत्तर – दक्षिण ३२ फुट, पूर्व – पश्चिम ३६ फुट एकूण ११५२ चौरस फुट.

ज्याची चतुर्सिमा पूर्वेस :– २५ फुटाचा रस्ता, पश्चिमेस :– मोकळी जागा क्र. ०८, उत्तरेस – मोकळी जागा क्र. ०२, आणि दक्षिणेस :– मोकळी जागा क्र. १०. मौजे गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथील मिळकत खरेदी करण्याचा सौदा केला असून काही रक्कम बयाना म्हणून दिली आहे व लवकरच उपरोक्त मालमत्तेची रितसर खरेदी खत करून घेण्यास तयार आहे. त्यामुळे सदर वर्णनाच्या मालमत्ते बाबत कुणाचेही काही हितसंबंध, गहाण, बोजा किंवा वारसा हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी कळवावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व मुदतीनंतर माझे पक्षकार लवकरच खरेदी खत करून घेतील. सबब जाहीर प्रगटन.

मार्फत
**ॲड. दिलीप काळे**
किनवट,
मो. न. ९८५०९१५३९२

जाहीर प्रगटन देणार
**प्रवीण रामराव जगडमवार**
रा. आदर्श कॉलनी, किनवट
ता. किनवट जि. नांदेड
मो. क्र. ९०४९२४७५०६

## टी. सी. हरवली आहे

मी देगलूर ते हणेगाव या बसने प्रवास करीत असताना माझी अमोल काशीराम पवार या नावाची बारावी पासची टी. सी.व बारावी पासची सनद हरवली आहे. कृपया सापडल्यास पुढील पत्त्यावर कळवावे.

**संपर्क पत्ता–** अमोल काशीराम पवार, सेवादास नगर तांडा, हणेगाव, ता. देगलूर, जि. नांदेड

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय हदगाव**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, हदगाव यांचे न्यायालयात
मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३)
अन्वये अर्ज क्रं. अर्ज क्रंमाक–

रुपाली मारोती खंदारे चोरंबा बु.
विरुद्ध
जन्म चोरंबा बु.. मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी,

विषयः– मूत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये मारोती भागोराव खंदारे यांच्या मृत्युची नोंद घेण्याकरीता आदेशीत करणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार रुपाली मारोती खंदारे रा. चोरंबा बु. ता. हदगाव जि. नांदेड यांनी त्यांचे वडील मारोती भागोराव खंदारे याचा मृत्यू दि. ०४.०४.२०१५ रोजी चोरंबा बु. येथे मृत्यू झाला असून, सदर मृत्यु नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२३च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता मृत्यू नोंदणी निबधंक तथा ग्रामविकास अधिकारी चोरंबा बु. ता. हदगाव जि. नांदेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मारोती भागोराव खंदारे यांची मृत्यूची नोंद जन्म–मृत्यू नोंदणी निबधंक तथा ग्रामविकास अधिकारी, चोरंबा बु. ता. हदगाव जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडीलांचा दि. ०४.०४.२०१५ रोजी मृत्यूची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द्र झाल्याच्या दिनांका पासून १५ दिवसामध्ये या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**तालुका दंडाधिकारी,**
हदगाव

ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,
**ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस**
विष्णुपूरी, नांदेड - ४३१ ६०६.

**वर्कींग प्रोफेशनल कोर्सेससाठी प्रवेश सूचना**
**शासकीय कर्मचाऱ्यांना शिकण्याची सुवर्णसंधी**

मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या प्रवेश प्रक्रिया नियमावली निर्देशानुसार थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांसाठी वर्कींग प्रोफेशनल १२ वी विज्ञान/आयटीआय उत्तीर्ण झालेले व १ वर्षाचा औद्योगिक अनुभव असलेले शासकीय, निमशासकीय, कारखान्यातील (फक्त ५० कि.मी. परिसरातील) कर्मचाऱ्यांना सूचना

उपलब्ध अभ्यासक्रम
- Diploma in Civil Engineering
- Diploma in Electrical Engineering
- Diploma in Electronics & Tele-Communication
- Diploma in Mechanical Engineering
- Diploma in Medical Lab Technology

ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस विष्णुपूरी, नांदेड संस्थेत संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया २०२६-२०२७ साठी खालील प्रमाणे प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करण्यात येत आहे. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी सदरील वेळापत्रकानुसार प्रवेश घ्यावा.

| Sr. No. | Activity | Schedule | |
|---|---|---|---|
| | | Start | End |
| 01 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकृती | 26/07/2026 | 04/08/2026 |
| 02 | कागदपत्रांची छानणी व पडताळणी | 26/07/2026 | 04/08/2026 |
| 03 | तात्पुरती गुणवत्ता यादी | 04/08/2026 | दुपारी 2:00 वाजेपर्यंत |
| 04 | हरकती/तक्रार दुरुस्ती | 04/08/2026 | दुपारी 2 ते 4 वाजेपर्यंत |
| 05 | अंतिम गुणवत्ता यादी | 04/08/2026 | सायंकाळी 5:00 वाजता |
| 06 | शाखानिहाय प्रवेश (मुळ कागदपत्र व विहित शुल्क भरणा) | 05/08/2026 | 06/08/2026 |

तसेच महाविद्यालयात वर्कींग प्रोफेशनल करिता B.Tech. Computer Science & Engineering B.Tech. Safety & Fire Engineering थेट द्वितीय वर्षासाठी व MCA प्रथम वर्षाकरिता प्रवेश देणे चालू आहेत.

: संपर्क :
प्रा. कांबळे आर.एस.- 9403962019 | प्रा. सोनकांबळे ए.व्ही.- 9130402590

## टी. सी. हरवली आहे

माझी नंदकिशोर बालाजी वाघमारे या नावाची इयत्ता ८ वी पासची टी. सी. कंधार ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता–नंदकिशोर बालाजी वाघमारे, मु. पो. रमाईनगर कंधार, ता. कंधार, जि. नांदेड मो. ७४९८४५३९८९

## Change In Name

MY OLD NAME IS SAIYAD YASEEN SAIYAD MUSTAFA WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME YASEEN SAYYAD MUSTAFA HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME. **ADDRESS-** R/o H. No. 1-21-123 Maheboob Nagar, Noori Chwk Taroda Bk. Nanded-431605

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## ‘२०२८ ची कर्नाटक विधानसभा निवडणूक लढवणार नाही’-माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या

**बंगळुरु (वृत्तसंस्था)**– कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी निवडणूक राजकारणातून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले आहे की ते २०२८ ची विधानसभा निवडणूक लढवणार नाहीत. त्यांनी एका विस्तृत संदेशातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, आता त्यांचे वय वाढले असून पूर्वीपेक्षा त्यांच्यात ऊर्जा कमी झाली आहे आणि त्यामुळे, त्यांना पुढील निवडणूक लढवण्याची इच्छा नाही.

सिद्धरामय्या लिहितात, आज राजकारणाचे क्षेत्र पूर्णपणे भ्रष्ट झाले आहे. त्यामुळे, मी २०२८ ची विधानसभा निवडणूक उमेदवार म्हणून लढवणार नाही. पण, राजकारणात सक्रिय राहून, मी जनतेच्या सुख–दुःख आणि समस्यांसाठी आवाज बनून काम करत राहीन.


**Shri Guru Gobind Singhji Institute of Engineering and Technology, Nanded**
(Government Aided Autonomous Institute)
Vishnupuri, NANDED (Maharashtra State) PIN 431606 INDIA
उत्कृष्ट तंत्र ज्ञानार्थ जनशक्ति शिक्षणं
DTE Code: 2020
STD: 02462, Direct: 229234, 269101, 102 FAX: 229236 Email: director@sggs.ac.in, Website: www.sggs.ac.in

**WALK-IN INTERVIEWS**
**For Ad-hoc Assistant Professor (Contract Basis)**

Walk-in Interviews is scheduled for the appointment of Ad-hoc Assistant Professor on a purely contractual basis for a maximum period of Eleven (11) months or up to 30th June 2027, whichever is earlier, on a consolidated salary in various academic departments. Eligible and interested candidates possessing the prescribed qualifications in the relevant discipline are invited to appear for the 2nd Drive of Walk-in Interviews scheduled on 30th July, 2026. Candidates are required to report at the Institute (Admin Bldg.) one hour before the scheduled interview time along with original documents and one set of self-attested photocopies of all relevant certificates. For more details, visit www.sggs.ac.in
Further, applications are invited under the Institute Ph.D. Research Scholar Scheme (IPRSS) for admission to the Ph.D. programmes of the Institute. For more details, visit www.sggs.ac.in

Director

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# कागदावर कारवाई, प्रत्यक्षात धंदा सुरूच

## नवा मोंढ्यातील ताडी दुकान प्रकरण



**नांदेड (प्रतिनिधी)**– परवाना रद्द झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी ताडी दुकान सुरू झाल्याने नांदेडच्या नवा मोंढा परिसरातील प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी अन्न व औषध प्रशासन–एफडीएने नवा मोंढा, दुकान क्रमांक १२ येथील ताडी/सिंदी दुकानावर धाड टाकली. ताडी खरेदीचे बील आणि वाहतुकीची बिल्टी नसल्याचे आढळून आल्याने प्रशासनाने तत्परता दाखवत दुकानाचा परवाना रद्द केला आणि दुकान बंद करण्याचे आदेश दिले. मात्र, ज्या दुकानाचा परवाना रद्द करण्यात आला होता ते दुकान दि. २५ जुलैला पुन्हा सुरू झाले. एफडीएचे आदेश असूनही दुकान सुरळीतपणे सुरू असल्याचे दिसून आले. याबाबतचे छायाचित्रे आणि व्हीडीओ पुरावे उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे. माहितीनुसार या दुकानाचे मालक नांदेडमध्ये राहत नाहीत. काही स्थानिक युवक हे दुकान एजन्सी तत्त्वावर चालवत आहेत. अधिकृत कागदपत्रे नसतानाही दुकान सुरू असल्याने कायद्याच्या अंमलबजावणीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

या प्रकारामुळे स्थानिक प्रशासनाच्या देखरेखीवर आणि अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. मुंबईतून तुकाराम मुंढे यांनी शिस्तीचे आदेश देत असतानाच नांदेडमध्ये मात्र आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने केवळ कागदावर परवाना रद्द करून हात झटकू नयेत, तर प्रत्यक्षात बंद केलेल्या दुकानांवर लक्ष ठेवावे, असे मत व्यक्त केले जात आहे. या संदर्भात संबंधित विभागाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

# मिथुन जोंधळे यांचे आफ्रिकेत निधन



**लोहा (प्रतिनिधी)** – तालुक्यातील काबेगाव येथील मूळ रहिवासी असलेले जोंधळे कुटुंब काही वर्षांपूर्वी लोहा येथे स्थायिक झाले. या कुटुंबातील मिथुन तातेराव जोंधळे हे पश्चिम आफ्रिकेतील घाना सिटी येथे नोकरीनिमित्त वास्तव्यास होते. तेथेच त्यांचे दि. ३ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर लोह्यात २० दिवसानंतर म्हणजे दि. २४ जुलै रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

मिथून यांनी औरंगाबाद, पुणे येथे व्यवसाय केल्यानंतर सन २०२३ मध्ये पश्चिम आफ्रिकेतील घाना सिटी येथील जे.के.कंपनीत उत्पादन व्यवस्थापक पदावर नोकरीची संधी त्यांना मिळाली. त्यांनी दोन वर्षाच्या करारावर सदर नोकरी पत्करली होती. दीड वर्षे त्यांनी त्या कंपनीमध्ये नोकरी केली. दरम्यान त्यांना तिकडेच मेंदू विकार झाल्यामुळे त्यांच्यावर जे. के. कंपनीने वैद्यकीय उपचार सुरु केले. मात्र उपचारादरम्यान मिथुन जोंधळे (३९) यांचे घाना सिटी येथील रुग्णालयात दि. ४ जुलै २६ रोजी निधन झाले. दि. २४ जुलै रोजी लोहा येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहीण, भावजय, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

# नागापूर येथे अवैध वाळू घाटावर पोलिसांची धाड; ५६ लाखांचा मुद्देमाल जप्त, ६ जणांवर गुन्हा दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने नागापूर येथील गोदावरी नदीपात्रात अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर धडक कारवाई केली. या कारवाईत सुमारे ५६ लाखांचा मुद्देमाल जप्त करून ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली दि. २४ जुलै रोजी नागापूर येथील गोदावरी नदीपात्रात यांत्रिक साधनांच्या साहाय्याने अवैध रेती उपसा करून वाहतूक होत असल्याच्या गोपनीय माहितीवरून पंचांसमक्ष घटनास्थळी छापा टाकला.

छापा कारवाईत अवैध उपसा केलेली वाळू अंदाजे १० ब्रास (किंमत ५० हजार) ३ मोठ्या लोखंडी बोटी, प्रत्येकीत अंदाजे ३ ब्रास वाळू एकूण किंमत ४५ लाख ४५ हजार, लहान लोखंडी बोट– त्यात १ ब्रास रेती किंमत १० लाख ५ हजार रुपये, रेती उपशासाठी वापरलेले साहित्य असा मुद्देमाल जप्त केला. नदीपात्रातील मोठ्या बोटी आणि रेती पर्यावरणाला धोका निर्माण होऊ नये म्हणून जागेवरच नष्ट करण्यात आल्या. पंचनामा करून एकूण ५६ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे गु.र.नं. ९०४/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३ (५), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यावेळी गजानन लालबा मस्के रा. नागापूर, ता.जि. नांदेड, बालाजी मुंजाजी सपुरे रा. नागापूर, ता. नांदेड, सचिन संभाजी सपुरे रा. नागापूर, ता. नांदेड यांना अटक करण्यात आली. मात्र इतर ३ जण फरार झाले. ही कारवाई एसपी डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. चिंचोलकर, पो.उप.नि. चव्हाण तसेच अंमलदार जेंकुट, गुरुनाथ कारामुंगे, कदम, कांबळे, आसिफ, माळगे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# नरसीतील दोन लॉजवर पोलिसांचा छापा

## लॉज मालकासह १० जणांविरुद्ध गुन्हा; सात महिलांची सुटका



**नरसीफाटा (प्रतिनिधी)**– नरसी येथील बसस्थानका–समोरील आशीर्वाद लॉज व आनंद लॉज येथे सुरू असलेल्या कथित अनैतिक व्यापारावर नांदेड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने शनिवारी (दि. २५) धडक कारवाई केली. या कारवाईत सात पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, लॉज मालकासह १० जणांविरुद्ध रामतीर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार व पोलीस उपअधीक्षक शाम पानेगावकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. या दोन्ही लॉजमध्ये महिलांना पैशांचे आमिष दाखवून व बळजबरीने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.

या माहितीची शहानिशा करण्यासाठी पोलिसांनी दोन सामाजिक कार्यकर्त्यांना बनावट ग्राहक म्हणून संबंधित लॉजमध्ये पाठवले. ठरलेल्या संकेतांनंतर पोलिसांनी दोन्ही लॉजवर एकाचवेळी छापा टाकला. कारवाईदरम्यान नांदेड व पश्चिम बंगाल येथील सात महिलांची सुटका करण्यात आली. घटनास्थळावरून रोख रक्कम, मोबाईल, इतर साहित्य व २ लाख ४ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# आसना पुलाजवळील खून प्रकरणी २ आरोपींना अटक



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आसना पुलाजवळील खून प्रकरणातील १५ दिवसांपासून फरार असलेल्या दोन आरोपींना अटक केली आहे. हा गुन्हा विमानतळ ठाण्यात दाखल करण्यात आला होता.

दि. ११ जुलै रोजी आसना नदीवरील पुलाखाली सचिन काळे यांचा मृतदेह आढळून आला होता. याप्रकरणी विमानतळ ठाण्यात गु.र.नं. ३२०/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३(५) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मारेकऱ्यांना तात्काळ अटक करण्याचे आदेश डॉ. निलाभ रोहन यांनी पो.नि. स्थानिक गुन्हे शाखा यांना दिले होते.

२६ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे व त्यांचे पथक नांदेड शहरात फरार आरोपींचा शोध घेत होते. गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार गेल्या १५ दिवसांपासून फरार असलेले आरोपी अनिल शंकर वाघमारे व प्रज्वल उर्फ बारक्या उत्तम गोवंदे हे शंकरराव चव्हाण चौक येथील पुलाखाली, मुदखेडकडे जाणाऱ्या रस्त्यावर येणार असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे पथकाने नमूद ठिकाणी सापळा रचून दिलेल्या वर्णनानुसार दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे अनिल शंकर वाघमारे वय २४ वर्षे, रा. माळजानगर, माळटेकडी, ता. जि. नांदेड आणि प्रज्वल उर्फ बारक्या उत्तम गोवंदे वय २० वर्षे, रा. त्रिरत्ननगर, सांगवी बुद्रुक, ता. जि. नांदेड अशी सांगितली. प्राथमिक चौकशीत दोन्ही आरोपींनी सदर खून प्रकरणात सहभाग असल्याची कबुली दिली.

## इकडचं तिकडचं

# पोराला श्येक्युरिटी गार्ड करणार न्हाई

यशवंत कॉलेज ते भाग्यनगर रोड, वेळ दुपारी बारा–साडेबाराची. बहुतांश क्लासेस या रोडवर असल्याने व सकाळच्या बॅचेस सुटण्याची वेळ झाल्याने रस्ता गजबजलेला. सावित्रीबाई फुले शाळेजवळ एका क्लासबाहेर पाऊस उघडण्याची वाट पहात मी आडोशाला उभा होतो.

पालक व व्हॅनवाले बॅच सुटण्याची वाट बघत होते. तेवढ्यात रस्त्याच्या विरुद्ध दिशेला चार–पाच मोटारसायकलवर ट्रिपलसीट बसून दहा–पंधरा टारगट पोरांचा घोळका येऊन थांबला. क्लासच्या सिक्युरिटी गार्डने त्यांना तिथे थांबण्यास मनाई करण्याचा प्रयत्न केला. त्यांची बराचवेळ बाचाबाची सुरू होती. पोटासाठी गार्डची नौकरी करणाऱ्या त्या बिचाऱ्याला या टवाळखोरांनी धक्काबुक्की सुध्दा केली. क्लास सुटल्यावर विद्यार्थिनींच्या मागे टवाळक्या व पाठलाग करत ते टोळकं निघून गेलं. हताश होऊन गार्ड आपल्या जागेवर बसला. टाईमपास म्हणून त्याच्याशी गप्पा मारल्यावर बदलत्या काळाविषयीची त्याची निरीक्षणं आणि मतं ऐकून मीच थक्क झालो.

साहेब, पंधरा वर्षांपासून हितच आन हिच नौकरी करतोय. आवो, आधीबी अशी कार्टी धुडगूस घालायची, पण आमी निस्ती काठी बडविली तर चिंगाट पळून जायची. आताची पोरं त्यायच्या मायबापालाच भिईनात, आमचं काय?

मी म्हणालो, पण पोलीस सतत फिरतात की या रोडवर, मी नेहमीच इकडे पोलिसांची गाडी बघतो.

तो म्हणाला, तेवढं एक लई बरं हाय बगा, पर फक्त सांजच्याला असत्यात पोलीस, आन तेबी पलिकडं भाग्यनगरच्या कोपऱ्यात गाडी उभी करत्यात. इकडं राजेंद्रनगर, बाबानगर आन शाळेच्या बाजूच्या रस्त्यांनी ही कार्टी बोळाबोळातून पळून जात्यात. आन पोलिसांनाचं वाकडं दाखवित्यात. भीती ऱ्हाईलीच न्हाई बगा यायला. बरं ही कोणत्याबी क्लासची पोरं न्हाईत, अशीच या रोडवर घोळक्यानी पोरींना तरास देत फिरत्यात. म्या तर ठरविलं बगा, काईबी झालं तर पोराला शेक्युरिटी गार्ड करणार न्हाई. त्येनं भीक मागून खाऊद्या, मला चाललं.

सैरभैर तरुणाईला आवरणे ही सुध्दा आता फक्त पोलिसांचीच जबाबदारी आहे का?

माझ्या वडिलांचे एक वाक्य मला आठवले की, प्रत्येक पोलीस या देशाचा गणवेशातील नागरिक व या देशातील प्रत्येक नागरिक हा साध्या वेशातील पोलीस बनायला हवा. तरच या देशाची कायदा व सुव्यवस्था इथून पुढे टिकून राहील. प्रत्येक गोष्टीचा भार पोलिसांवर टाकला आणि आपण आपली जबाबदारी झटकली तर या देशाचे वाटोळे होण्यापासून कुणीही वाचवू शकणार नाही... त्या गार्डच्या मदतीला एकही पालक का आला नसावा? पूर्वाश्रमीचा काही कटू अनुभव की आपल्याला काय त्याचे, ही बेपर्वाई?

थोड्याच वेळात पाऊस उघडला. वडिलांचे शब्द माझ्या कानात घुमत राहिले आणि मी गाडी सुरू करुन तिथून निघालो...

– शिवाजीराजे पाटील बाभळीकर

# जिल्हा व शहर काँग्रेसच्या निष्ठावंत पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर अन्याय

## बालाजी चव्हाण यांची महाराष्ट्र सहप्रभारी रेहाना चिश्ती यांच्याकडे तक्रार

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीमध्ये निष्ठावंत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना डावलून खा. रवींद्र चव्हाण यांनी मोठा अन्याय केला असून, आयाराम–गयारामांची महत्वाच्या पदांवर वर्णी करून पक्षाला भाजपच्या दावणीला बांधले आहे. या सर्व प्रकाराची चौकशी करून निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते बालाजी चव्हाण यांनी पक्षाच्या राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र सहप्रभारी रेहाना चिश्ती यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड दौऱ्यावर आलेल्या रेहाना चिश्ती यांची प्रत्यक्ष भेट घेऊन बालाजी चव्हाण यांनी निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले की, मागील दोन वर्षांमध्ये काँग्रेस पक्षात भाजप पक्षाचे स्लीपर सेल म्हणून (बी. टीम) काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना खा. रविंद्र चव्हाण यांनी पदे दिली आहेत. त्यामुळे काँग्रेस पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांवर अन्याय झाल्याचे निवेदनात म्हटले आहे.

मागील १३ नगरपालिका निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्याला उमेदवारी देण्यात आलेली नाही. अनेक ठिकाणी उमेदवारच मिळाले नाहीत आणि ज्या लोकांना उमेदवारी देण्यात आली ते उमेदवार मोठ्या मतांच्या फरकाने पराभूत झाले आहेत. खासदार रविंद्र चव्हाण यांच्या लोकसभा मतदार संघामध्ये एकही नगरपालिका, नगरपंचायतमध्ये नगराध्यक्ष निवडून आलेला नाही. तसेच १८५ जागांवर उमेदवारी दिली होती. केवळ ४७ नगरसेवक निवडून आले. उर्वरित सर्व उमेदवार पराभूत झाले. त्याठिकाणी पक्षाच्या एकही स्टार प्रचारक प्रचारासाठी बोलावण्यात आले नाही, असेही निवेदनात म्हटले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकामध्ये सुद्धा अशाच प्रकारचे राजकारण करून काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ व निष्ठावंत कार्यकर्त्याला डावलण्यात आले. आवश्यकता नसताना वंचित बहुजन आघाडीसोबत युती करून काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांवर विशेषतः दलित समाजातील कार्यकर्त्यांवर मोठा अन्याय करण्यात आला. त्यामुळे पक्षातील अनेक दलित पदाधिकारी पक्ष सोडून इतर पक्षामध्ये गेले, काहीजण घरी बसले व पक्षातील कार्यकर्त्यांना ए. बी. फॉर्म देताना अनेक चुका केल्या, अशी तक्रारही केली.

# चिमुकल्या वारकऱ्यांच्या दिंडीने सहयोग कॅम्पस भक्तिमय



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – विष्णुपुरी सहयोग कॅम्पसमध्ये इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या चिमुकल्यांनी आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ‘मिनी पंढरी’ दिंडी सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. ज्ञानोबा–तुकाराम, माऊली... माऊली..., विठ्ठल... विठ्ठल... अशा नामघोषाने कॅम्पस दुमदुमून गेला. पारंपरिक वारकरी वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी हातात टाळ, भगवे झेंडे, तुळशी वृंदावन आणि डोक्यावर तुळशीची कुंडी घेऊन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने दिंडीत सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या हस्ते पालखी पूजन करून झाली. त्यानंतर त्यांनी स्वतः पालखी खांद्यावर घेत दिंडीची सुरुवात केली. पालखी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी अभंग, भजन आणि विठ्ठल नामाचा गजर करत संपूर्ण परिसर भक्तिमय केला.

दिंडीदरम्यान चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वारकरी परंपरेवर आधारित नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या निरागस, उत्स्फूर्त आणि मनमोहक नृत्याने मोठ्यांनाही ठेका धरायला भाग पाडले. विद्यार्थ्यांच्या आनंदात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकही सहभागी झाले. त्यामुळे काही क्षणांसाठी चिमुकले वारकरी आणि विठुराया भक्तिरंगात एकरूप झाल्याचे अलौकिक दृश्य अनुभवायला मिळाले.

या प्रसंगी इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचे प्राचार्य विक्रम ढोणे, उपप्राचार्या रुपाली गुंडाळे तसेच अशोक मेटकर, विष्णुकांता पवार, सुनंदा शेळके, हेमा येलके, विजयश्री तेलंगे, नरेंद्रकुमार वनंजे, बुद्धदेव सोनपारखे इ. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सहयोग कॅम्पसमधील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड उत्तरमध्ये ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान’ संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील ए. के. संभाजी मंगल कार्यालय येथे आयोजित ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान’ नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरित्या संपन्न झाले.

नागरिकांना शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि सेवा ‘एकाच छताखाली, एकाच दिवशी’ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या अभियानात विविध शासकीय विभागांनी माहिती, मार्गदर्शन, अर्ज स्वीकृती, प्रमाणपत्रांचे वितरण तसेच विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ उपलब्ध करून दिला.

या अभियानात महसूल, पुरवठा, कृषी, भूमी अभिलेख, आरोग्य, पंचायत समिती, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), उमेद ग्रामीण जीवनोन्नती अभियान, सायबर सेल, भरोसा सेल, रेशीम विभाग, महावितरण, पशुसंवर्धन, परिवहन, जिल्हा उद्योग केंद्र, प्रधानमंत्री स्वनिधी योजना आदी विभागांनी सक्रिय सहभाग घेत नागरिकांना विविध सेवांचा लाभ उपलब्ध करून दिला.

शिबिराला ३,६५८ नागरिकांनी भेट देऊन सातबारा, महिला शेतकरी प्रमाणपत्र, ईडब्ल्यूएस, उत्पन्न, जात, नॉन–क्रिमिलिअर, भूमिहीन, रहिवासी प्रमाणपत्र, जन्म–मृत्यू दाखले, रेशन कार्ड, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, लेक लाडकी योजना, लखपती दीदी योजना, बचत गट कर्जवाटप, स्वामित्व योजना, कृषी योजनांसह विविध शासकीय योजनांची माहिती व लाभ घेतला. यावेळी ९३२ पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ वितरित करण्यात आला. तसेच डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी यांच्या सहकार्याने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात २,७५८ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. याशिवाय आयोजित रक्तदान शिबिरातही अनेक रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

या अभियानातून शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, त्यांच्या समस्या तातडीने सोडविणे आणि प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणे हा उद्देश यशस्वीपणे साध्य झाला. कार्यक्रमास महापौर कविता मुळे, आ. बालाजी कल्याणकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व हजारो नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधर हंबर्डे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, नायब तहसीलदार स्वप्नील दिगलवार, संजय नागमवाड, सुनील माचेवाड यांच्यासह महसूल, पंचायत, कृषी, आरोग्य व इतर विभागातील अधिकारी–कर्मचारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक आणि नांदेड तहसील कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com